दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –२४५ शुक्रवार दि.१५ मे २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-245 Friday, Dt.15 May 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

मुख्यमंत्री मोटरसायकलवर बसल्याने खरोखरच इंधन वाचणार ?

का केवळ प्रतिमा निर्मितीची राजकीय कवायत ठरणार ?

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंधन बचतीचा संदेश देण्यासाठी स्वतः मोटरसायकलवरून प्रवास करत मंत्रालयामध्ये प्रवेश केला. आणि त्याचे फोटो-व्हिडिओ राज्यभर झळकले. सरकारच्या बाजूने हा जनजागृतीचा संदेश असल्याचे सांगितले गेले. पण प्रश्न एवढाच आहे का ? महाराष्ट्रातील सामान्य नागरिक आज पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किंमतींनी त्रस्त असताना, बेरोजगारी, महागाई आणि ढासळत्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमुळे होरपळत असताना, मुख्यमंत्री मोटरसायकलवर बसल्याने खरोखर इंधन वाचणार आहे की ही केवळ प्रतिमा निर्मितीची राजकीय कवायत आहे ?

राजकारणात प्रतीकांना महत्त्व असते, हे खरे. पण प्रतीक आणि वास्तव यात फरक असतो. मुख्यमंत्री स्वतः मोटरसायकलवर बसले, हा दृश्यात्मक संदेश प्रभावी असू शकतो. मात्र त्याचवेळी राज्यातील लाखो नागरिक रोज जीव धोक्यात घालून दुचाकीवर प्रवास करतात, कारण त्यांच्याकडे पर्यायच नाही. सार्वजनिक बससेवा अपुरी, रेल्वेवर प्रचंड ताण, ग्रामीण भागात वाहतुकीचे दारुण हाल

या मूलभूत प्रश्नांवर सरकारने किती ठोस उपाय केले, हा अधिक महत्त्वाचा मुद्दा आहे.

इंधन बचतीचा उपदेश जनतेला देताना सरकारने स्वतःच्या धोरणांकडेही पाहायला हवे. महाराष्ट्रात रस्त्यांवरील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक शहरांत सिग्नलवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. यात दररोज कोट्यवधी रुपयांचे इंधन जळते. शहरी नियोजनातील अपयश, सार्वजनिक वाहतुकीतील गुंतवणुकीचा अभाव आणि प्रशासनातील अनागोंदी यामुळे नागरिकांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते. मग केवळ मोटरसायकलवरून फेरफटका मारून सरकार आपली जबाबदारी झटकू शकत नाही.

याहून मोठा विरोधाभास म्हणजे एका बाजूला इंधन बचतीचे संदेश दिले जातात, तर दुसऱ्या बाजूला व्हीआयपी ताफे, मोठमोठ्या गाड्यांची फौज आणि सरकारी यंत्रणेतील उधळपट्टी कायम दिसते. मंत्र्यांचे ताफे कमी झाले का ? सरकारी बैठका ऑनलाइन करण्याचे प्रमाण वाढले का ? शासकीय वाहनांचा इंधन वापर कमी

पान २ वर...

पाटोदा गायरान जमीन मोजणीत घोळ ?

भूमी अभिलेख अधिकाऱ्यांवर संगनममताचा आरोप, उच्च न्यायालयाच्या आदेशाला हरताळ फासण्याचा प्रयत्न, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील सर्वे नंबर ७१५ मधील शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमणे हटवण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिलेले असतानाही, भूमी अभिलेख आणि महसूल विभागाचे अधिकारी राजकीय दबावाखाली चुकीची मोजणी करून अतिक्रमणधारकांना पाठीशी घालत असल्याचा खळबळजनक आरोप तक्रारदार शेख मोबीन हमीद यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी तक्रार देऊन दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाईची मागणी केली आहे.

पाटोदा येथील सर्वे नंबर ७१५ या गायरान जमिनीवर नगरसेवक सय्यद अब्दुल्ला सय्यद यासीन यांनी बेकायदेशीर घराचे बांधकाम करून अतिक्रमण केल्याचा आरोप आहे. या अतिक्रमणाविरुद्ध शेख मोबीन हमीद यांनी ड . एन. एल. जाधव यांच्यामार्फत छत्रपती संभाजीनगर खंडपीठात जनहित याचिका (क्र. २७/२०२५) दाखल केली होती. त्यावर सुनावणी करताना न्यायालयाने १४ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना कायदेशीर कारवाईचे निर्देश दिले होते.

मोजणीत फेरफार केल्याचा आरोप...

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, १३ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता जमिनीची हद्द निश्चित करण्यासाठी मोजणी आयोजित करण्यात आली होती. मात्र, निमतदार श्याम दिगंबर पुजारी व इतर अधिकाऱ्यांनी सर्वे नंबर ७१५ ऐवजी जाणीवपूर्वक सर्वे नंबर ७१२ मध्ये खुणा निश्चित करण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे, लगतच्या शेतमालकांना कोणतीही कायदेशीर नोटीस न देता ही प्रक्रिया गुप्तपणे पार पाडण्यात आली.

पत्रकार संघाचे संस्थापक संजय भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा देवून

हत्येच्या कटामागील मुख्य सूत्रधार शोधा - वैभव स्वामी

बीड / प्रतिनिधी

सांगलीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक तथा राज्य संघटक संजय भोकरे यांच्या हत्येचा डाव पोलिसांनी उधळून लावला आहे. या प्रकरणामुळे भोकरे कुटुंबियांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. राज्य सरकारने याची गांभीर्याने दखल घेवून या घटने मागील मुख्य सूत्रधारांना अटक करून भोकरे साहेब यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी अशी मागणी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या नेतृत्वाखालील बीड जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आली.

सांगली पोलिसांनी या प्रकरणात तीन आरोपींना ५ दिवसापूर्वी अटक केली. त्यांच्या ताब्यातून दोन देशी बनावटीची पिस्तुले, चार जिवंत काडतुसे आणि धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली.

मात्र अजूनही मुख्य सूत्रधारांना पकडण्यात पोलिसांना यश आले नाही. त्यामुळे त्यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी आणि मुख्य सूत्रधारांना तात्काळ अटक करून त्यांचे चेहरे समोर आणावेत. पोलिसांनी या प्रकरणात कोणालाही पाठीशी घालू नये अशी लेखी मागणी निवेदनाद्वारे बीड जिल्हा शाखेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत करण्यात आली. या मागणीचे निवेदन निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना देताना पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष शेख ताहेर, जिल्हा सहसचिव अमोल शिंदे,सदस्य शेख एजाज वडवणी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

मी सहभागी झाले, आपणही जनगणनेत सहभागी व्हा

नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

'जनगणना से जन कल्याण' म्हणजेच जनगणनेतून जन कल्याण. अचूक आकडेवारीमुळे शासकीय योजनांसह वीज, रस्ते, आरोग्य, शिक्षण यांसारख्या क्षेत्रांचे नियोजन करता येते. सरकारी योजनांचा योग्य लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यास मदत होते. त्यामुळे जनगणना आवश्यक आहे. मी स्वत: जनगणनेत सहभागी होऊन स्व माहिती भरली आहे. आपणही जनगणनेत सहभागी व्हावे असे आवाहन बीडच्या नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी केले आहे. प्रत्येक नागरीकाने जनगणनेत सहभागी होऊन माहिती संकलनासाठी येणार्या प्रत्येक कर्मचार्यास सहकार्य करावे असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

बीड शहरासह जिल्हाभरात जनगणना सुरू आहे. भारताची ही १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरही ८ वी जनगणना आहे. ही पहिली डिजीटल जनगणना असून गणक कर्मचारी मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलित करत आहेत. नागरीकांसाठी स्वत: माहिती भरण्याची सुविधा प्रथमच उपलब्ध करून देण्यात आली आहे. पोर्टलवर नागरीकांनी

स्वत:च्या घराची माहिती भरावी. दोन टप्यात होणार्या जनगणनेत पहिला टप्पा घरांची यादी आणि गृह जनगणना आणि दुसरा टप्पा लोकसंख्या गणना असा आहे. जनगणनेतून सर्व माहिती संकलित करण्यात येत आहे. ही माहिती सरकारी योजना राबवण्यास अत्यंत महत्वाची आहे. त्या अनुषंगाने बीड शहरातील प्रत्येक नागरीकाने जनगणना प्रक्रियेत सहभागी व्हावे. संबंधित पोर्टलवर याची माहिती भरावी आणि त्यानंतर घरी येणार्या गणकास याची माहिती देऊन सहकार्य करावे असे आवाहन नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी केले आहे.

शिवहारे कन्स्ट्रक्शनला तहसीलदारचा दणका; कन्ट्रक्शन बंद ठेवण्याचे आदेश

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात सुरू असलेल्या शिवहारे कन्स्ट्रक्शन कंपनीच्या कामांबाबत महसूल प्रशासनाने गंभीर दखल घेतल्याची माहिती समोर येत आहे. खडी क्रेशर, खदान व रस्ते कामांमध्ये नियमांचे उल्लंघन, शेतकऱ्यांच्या तक्रारी आणि पर्यावरणीय मुद्द्यांवरून तहसीलदार कार्यालयाने संबंधित विभागांकडून अहवाल मागवल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही प्रश्न सुटत नसल्याने प्रशासनाने कंट्रक्शन वर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. विशेषतः रस्त्यांची हानी, धुळीचे प्रदूषण, शेतीचे नुकसान

आणि परवानगीच्या अटींचे पालन व तहसीलदार उपस्थित राहत नसल्याने या मुद्द्यांवर कारवाईचे आदेश काढण्यात आले आहेत.

तहसीलदारांनी संबंधित तहसीलदार यांनी प्रत्यक्ष पाहणीचे निर्देश दिल्याची माहिती मिळत असून, दंडात्मक कारवाईसह काम बंद करण्याचाही इशारा दिला आहे. दरम्यान, शेतकरी व ग्रामस्थांनी प्रशासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे.

वडवणी तालुक्यामध्ये

ए.के. शिवहारे कन्स्ट्रक्शन कंपनीचे खदान, हायपॉवर खडी क्रेशर व केमिकल मिश्रीत सिमेंट फॅक्टरीचे काम सुरू आहे. या फॅक्ट्रीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे जे नुकसान झालेले आहे त्याची होणारी नुकसानीबाबत न्याय हक्कासाठी दि. ०५.०५.२०२६ रोजी कंपनी विरोधात उपोषण करण्यात आले श्री आसाराम सुदाम नागवे व ईतर

पान २ वर...

दरोडा व बलात्काराच्या गुन्हयात आरोपीस १० वर्षे सक्तमजुरी

सहाय्यक सरकारी वकील अँड. मंजुषा एम. दराडे यांनी केलेल्या प्रभावी युक्तीवादामुळे न्यायालयाने आरोपी सौरभ गायकवाड यास ठोठावली शिक्षा

बीड ।प्रतिनिधी

बीड दरोडा व बलात्कार केल्याच्या गुन्हयात आरोपी सौरभ गायकवाड यास बीड येथील अतिरीक्त सत्र न्यायाधीश श्री. एस.एस. घोरपडे साहेब यांनी १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा दि. १४ मे २०२६ रोजी सुनावली आहे. या प्रकरणाकडे बीड जिल्ह्याचे लक्ष वेधलेले होते. सहाय्यक सरकारी वकील अँड. मंजुषा एम. दराडे यांनी केलेल्या प्रभावी युक्तीवादामुळे न्यायालयाने आरोपी सौरभ गायकवाड यास दंडासह शिक्षा सुनावली आहे.

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, अंभोरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत फिर्यादी ही तिचे नवऱ्यासोबत अहिल्यानगरहून गावाकडे मोटारसायकलवर येत असताना रस्त्याच्या कडेला थांबली असता तिथे सौरभ गायकवाड व अन्य दोघे आले व त्यांनी प्रथम पिडीतेच्या

पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

यशवंत मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर हनुमंतगाव संचलित
यशवंत कॉलेज ऑफ नर्सिंग,आष्टी
ता. आष्टी, जि. बीड - ४१४२०३
2026-27 ADMISSION OPEN
HURRY UP
* वैशिष्ट्ये *
* शासन नियमानुसार शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध.
* तज्ञ व अनुभवी शिक्षकवृंद व कर्मचारी वर्ग.
* सुसज्ज इमारत/अद्यायावत प्रयोगशाळा.
* डिजीटल क्लासरूम.
* प्रशिक्षणासाठी नामांकित हॉस्पीटलमध्ये प्रशिक्षणाची सोय.
* मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल.
* २४ तास अभ्यासिका.
* मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची सोय.
* शासकीय, निमशासकीय, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, खाजगी क्षेत्रात नोकरीची संधी.
* मुला-मुलींना स्वावलंबी बनण्याची सुवर्ण संधी.
B.Sc. NURSING
ELIGIBILITY 12 TH SCIENCE CET QUALIFIED
P.B.B.Sc. NURSING
ELIGIBILITY GNM Complete CET QUALIFIED
GNM / ANM NURSING
ELIGIBILITY 12 TH PASS SCIENCE I COMMERCE I ARTS
CET CELL COLLEGE CODE 9398
FACILITY 100 % SCHOLARSHIP FOR SC / ST / NT / VJNT / OBC STUDENTS SWADHAR YOJANA

पत्ता : यशवंत कॉलेज ऑफ नर्सिंग, मंगरूळ रोड, माऊलीनगर, मुर्शदपूर, ता.आष्टी, जि.बीड
फोन नं. (०२४४१ - २८३२३२)
* अधिक माहितीसाठी संपर्क *
9422244244 / 7588567067
9552787850 / 9075499973

संपादकीय....

राजकारण्यांची सोंगं सुरू !

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला काटकसरीचे आवाहन केल्यानंतर सर्वत्र काटकसरीचा मंत्र घुमू लागला आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारांनी मोटारीचे ताफे कमी करणे, विदेश प्रवास रद्द करणे असे उपाय योजण्यास सुरुवात केली आहे. या बदलाची सुरुवात खुद्द मोदी यांनी स्वत:पासून केली असून पंतप्रधानांच्या ताफ्यात यापुढे केवळ दोनच गाड्या असतील. प्रशासकीय खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि सार्वजनिक पैशाची बचत करणे हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजप नेते जे. पी. नड्डा यांनीही आपल्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी केली आहे. पंतप्रधानांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या विशेष सुरक्षा दलाने (एसपीजी) सुरक्षेच्या सर्व पैलूंचा फेरआढावा घेतला आहे.

या आढाव्यानंतर सुरक्षेशी कोणतीही तडजोड न करता ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी करणे शक्य होणार आहे. यापूर्वी पंतप्रधानांच्या प्रवासासाठी डझनहून अधिक गाड्यांचा वापर केला जायचा. ज्यात काही 'डमी' गाड्यांचा समावेश असायचा. आता मात्र ताफ्यात केवळ दोनच गाड्या असतील. या कपातीमुळे केवळ इंधनाचीच बचत होणार नाही. तर ताफ्यातील इतर गाड्यांच्या देखभालीवर मोठ्या प्रमाणावर होणार खर्चही वाचणार आहे. पंतप्रधानांच्या आवाहनाला केंद्र सरकारमधील मंत्री, अनेक राज्यांतील मुख्यमंत्र्यांनी प्रतिसाद दिला आहे. अनेक मंत्र्यांनी आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी केली आहे तसेच अनेक महत्त्वाच्या बैठका ऑनलाईन घेण्याचा निर्णय झाला आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आपला ताफा कमी करण्यासह इतर उपाययोजना राबवण्याचे निर्देश दिले आहेत.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनीही यापुढे बसने जाण्याचा निर्णय घेतला आहे. वाहनांची संख्या निर्धारित संख्येपेक्षा अधिक नसेल याची जबाबदारी संबंधित पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक यांची असेल, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या आहेत. मंत्री-अधिका-यांनी कोणतेही विदेश दौरे करू नयेत. मंत्र्यांनी अत्यावश्यक नसेल तेव्हा शासकीय विमान, हेलिकॉप्टर यांचा वापर करू नये. त्याऐवजी नियमित विमानसेवेचा वापर करावा, अधिका-यांना बैठकांना बोलावण्याऐवजी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठका घ्याव्यात आणि तेथे डेकोरेटिव्ह लायटिंगचा वापर होणार नाही याची काळजी घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. पंतप्रधान मोदींच्या इंधन बचतीच्या आवाहनावरून विरोधकांकडून टीका केली जात आहे, त्यावर बोलताना फडणवीस म्हणाले, जागतिक संकटाच्या वेळी देशाचे पंतप्रधान काही उपाय सांगत असतील तर त्याकडे सकारात्मकपणे पाहिले पाहिजे. जगभरातील अनेक देशांची स्थिती बिकट आहे. अनेक देशांमध्ये लॉकडाऊन लागला आहे. पेट्रोलचे दर ५०० रुपयांपर्यंत गेले आहेत.

जागतिक संकटात देशाची अर्थव्यवस्था सुरळीत राहावी, देशासमोर संकट निर्माण होऊ नये या दृष्टीने पंतप्रधान काही उपाय सांगत असतील आणि विरोधकांना त्या अमलात आणायच्या नसतील तर किमान त्याची थट्टा-मस्करी तरी करू नका, असा सल्ला फडणवीसांनी दिला. युध्दपातळीवरील काटकसरीच्या या उपायांमुळे राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात विविध अंदाज व्यक्त केले जात आहेत. येत्या काही दिवसांत इंधन वापराबाबत काही निर्बंध लादले जाऊ शकतात अशी चर्चा आहे. काहींच्या अंदाजानुसार पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. पंतप्रधानांच्या भूमिकेचे काही जणांनी कौतुक केले आहे. वाढती व्यापार तूट आणि परकीय चलन साठ्यावर येणारा ताण पाहता हे एक धाडसी आणि दूरदृष्टीचे पाऊल असल्याचे म्हटले जात आहे. विरोधक आणि सामान्य नागरिकांकडून यावर टीका होत आहे. मध्यमवर्गीयांसाठी सोने केवळ दागिना नसून ती एक सुरक्षित गुंतवणूक मानली जाते. पंतप्रधानांनी राष्ट्राच्या आर्थिक सुरक्षेचा विचार करून वक्तव्य केले असले तरी सामान्यांच्या दैनंदिन गरजा आणि त्यांच्या भविष्यातील आर्थिक तरतुदींचा विचार यात कोठे आहे, असा सवाल केला जात आहे.

यशवंत कॉलेज ऑफ नर्सिंग,आष्टी येथे २०२६-२७ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासह रोजगाराची संधी

आष्टी / एस.राजेंद्र लाड

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आरोग्य शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या यशवंत मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर, हनुमंतगाव संचलित यशवंत कॉलेज ऑफ नर्सिंग, आष्टी येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध नर्सिंग अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. आधुनिक सुविधा, अनुभवी शिक्षकवर्ग, प्रशस्त इमारत आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक वातावरण यामुळे अल्पावधीतच या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांमध्ये विश्वासार्ह स्थान निर्माण केले आहे.

आष्टी तालुक्यातील मंगरुळ रोड, माऊलीनगर, म्रुशदपूर, ता. आष्टी, जि. बीड येथे स्थित असलेल्या या महाविद्यालयात B.Sc. Nursing, P.B.B.Sc. Nursing तसेच GNM आणि ANM Nursing या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश खुले करण्यात आले आहेत. यासाठी विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमांनुसार पात्रता निकष निश्चित करण्यात आले आहेत. B.Sc. Nursing अभ्यासक्रमासाठी बारावी विज्ञान शाखा उत्तीर्ण व उएढ पात्रता आवश्यक असून, P.B.B.Sc. Nursing साठी GNM पूर्ण केलेले व उएढ पात्र उमेदवार अर्ज करू शकतात. तसेच GNM /ANM Nursing अभ्यासक्रमासाठी बारावी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र राहणार आहेत.

महाविद्यालयाचा CET Cell College Code - 9398 असून प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची गरज भासू नये, या उद्देशाने संस्थेने सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

महाविद्यालयाच्या वैशिष्ट्यांमध्ये शासन नियमानुसार शिष्यवृत्ती सुविधा, अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवृंद, आधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम, २४ तास अभ्यासिका, मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये प्रशिक्षणाची सुविधा, नामांकित हॉस्पिटलमध्ये प्रात्यक्षिक प्रशिक्षण तसेच मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची व्यवस्था यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवातून गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण होण्यासाठी संस्थेने विशेष प्रयत्न केले आहेत.

विशेष म्हणजे अनुसूचित जाती, जमाती, NT, VJNT आणि OBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजनेअंतर्गत शंभर टक्के शिष्यवृत्तीची सुविधा उपलब्ध असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांनाही नर्सिंग क्षेत्रात करिअर करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

आजच्या आधुनिक युगात आरोग्य सेवेला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले असून प्रशिक्षित नर्सिंग कर्मचाऱ्यांची मागणी

सातत्याने वाढत आहे. शासन, निमशासकीय संस्था, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान तसेच खासगी रुग्णालयांमध्ये नर्सिंग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे नर्सिंग शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर यशवंत कॉलेज ऑफ नर्सिंग विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत स्वावलंबी बनण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देत आहे.

प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी व पालकांनी महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. संपर्कासाठी फोन ०२४४१ - २८३२३२ तसेच मो. नंबर ९४२२२४४२४४, ७५८८५६७०६७, ९५५२७८७८५० आणि ९०७५४९९९७३ या क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे.

देशहितासाठी काटकसर हीच खरी देशभक्ती

पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला बीड जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा- भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख

बीड ।प्रतिनिधी

जागतिक स्तरावर निर्माण झालेली युद्धजन्य परिस्थिती, वाढते इंधन संकट आणि बदलती आर्थिक परिस्थिती लक्षात घेता देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी देशातील नागरिकांना काटकसर, इंधन बचत आणि राष्ट्रीय जबाबदारीचे भान राखण्याचे महत्त्वपूर्ण आवाहन केले आहे. हे आवाहन कोणत्याही प्रकारची भीती निर्माण करण्यासाठी नसून भविष्यात देशासमोर कोणतीही अडचण किंवा संकट निर्माण होऊ नये, यासाठी खबरदारीचा आणि दूरदृष्टीचा उपाय म्हणून करण्यात आले असल्याचे भारतीय जनता पार्टी बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी म्हटले आहे

प्रसिद्धीत दिलेल्या पत्रकात श्री देशमुख यांनी म्हटले आहे की देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत पंतप्रधानांनी स्वतःच्या ताफ्यात कपात करून आदर्श निर्माण केला असून महाराष्ट्र शासनानेही मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंत्र्यांचे व अधिकाऱ्यांचे परदेश दौरे रद्द करून जबाबदारीची भूमिका घेतली आहे. शासन आणि प्रशासन स्वतःपासून काटकसरीची सुरुवात करत असल्यामुळे सामान्य नागरिकांनीही यात सहभागी होणे ही काळाची गरज आहे.ही वेळ राजकारण करण्याची नसून देशहितासाठी एकत्र उभे राहण्याची आहे. पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाकडे विरोधकांनी केवळ राजकीय दृष्टिकोनातून न पाहता राष्ट्रहित, आर्थिक स्थैर्य आणि भविष्यातील सुरक्षिततेच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. देशाच्या हितासाठी घेतलेल्या खबरदारीच्या उपायांमध्ये सर्वांनी सहकार्य करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे.

भारतीय जनता पार्टीचा बीड जिल्हाध्यक्ष म्हणून मी बीड जिल्ह्यातील तमाम नागरिकांना आवाहन करतो की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या या सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण आवाहनाला प्रतिसाद देऊन राष्ट्रहिताच्या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनानुसार नागरिकांनी पुढील बाबींवर विशेष भर द्यावा -

* इंधनाचा अनावश्यक वापर टाळावा * सार्वजनिक वाहतुकीचा जास्तीत जास्त वापर करावा * वीज बचतीला प्राधान्य द्यावे * अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावे * स्वदेशी आणि स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे * सामाजिक ऐक्य, शिस्त आणि

संयम राखावा * देशाच्या सुरक्षेबाबत जागरूक राहावे आज प्रत्येक भारतीयाने देश प्रथम ही भावना मनात ठेवून पुढे येण्याची गरज आहे. बीड जिल्ह्यातील जनतेने नेहमीच राष्ट्रहिताच्या प्रत्येक उपक्रमात सकारात्मक सहभाग घेतला आहे. याही वेळी बीड जिल्हा देशासाठी आदर्श निर्माण करेल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

राजकारणापेक्षा राष्ट्रकारण मोठे - या भावनेतून सर्वांनी पंतप्रधानांच्या दूरदृष्टीपूर्ण आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देऊन देशहितासाठी एकजूट दाखवावी, हेच आजचे खरे राष्ट्रीय कर्तव्य आहे. असं शंकर देशमुख यांनी प्रसिद्ध पत्रकार म्हटले आहे

डक हॉस्पिटल येथे श्री श्री रविशंकर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

श्री श्री रविशंकर यांच्या जयंतीनिमित्त आर्ट ऑफ लिविंग परिवाराच्या वतीने डक हॉस्पिटल माजलगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या रक्तदान शिबिराचे उद्घाटन डॉ.सचिन डक यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात गुरुदेवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या प्रसंगी डॉ.मयुरी डक, भारत होके, ईश्वर आप्पा खुर्पे, नंदकुमार शिंदे, श्रीकृष्ण शेजुळ, गोकुळ सोळंके, बाळासाहेब तौर, प्रल्हादराव सरोदे, केशव बादाडे सर, प्रदीपजी घायतिडक, बाळासाहेब तौर तसेच आर्ट ऑफ लिविंग फाउंडेशन चे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान अनेकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. समाजहिताच्या दृष्टीने असे उपक्रम आवश्यक असून भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, असे आयोजकांनी सांगितले.

बीड - दि. १४-५-२०२६ गुरुवार रोजी सकाळी ९.३० वा. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त महामानव अभिवादन ग्रुपचे विनम्र अभिवादन.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-२९७ दि.०६.०४.२०२६

जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार **आप्पासाहेब बाजीराव खरात, रा.पाथरवाला बु. ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	नाव	अर्जदाराशी नाते	जन्म दिनांक
१	सुवर्णा आप्पासाहेब खरात	मुलगी	१७.०१.१९९०

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०६/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अंबड

जाहीर प्रगटन पेपर

मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७५५/२०२६
गणेश व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. डोळे एस. डी.)
अर्जदार :-
१. गणेश पि. विष्णुपंत आनेराव वय ५० वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. मसरत नगर, जालना रोड बीड ता. जि. बीड
२. ज्ञानेश्वर पि. विष्णुपंत आनेराव वय ४२ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. मसरत नगर, जालना रोड बीड ता. जि. बीड
विरुध्द
गैर-अर्जदार:-कोणी नाही.
मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते २ यांनी या न्यायालयात मयत कमलबाई भ्र. विष्णु आनेराव रा. बडी राज गल्ली बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत कमलबाई भ्र. विष्णु आनेराव यांचा मृत्यु दिनांक २१/१२/२०२५ रोजी बडी राज गल्ली बीड ता. जि. बीड येथे झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत कमलबाई भ्र. विष्णु आनेराव यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरह मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ११/०६/२०२६

आज दिनांक १४ माहे मे २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
अधीक्षक
सह दिवाणी
न्या.व.स्तर,गेवराई

पान १ वरून...

दरोडा व बलात्काराच्या...

नवऱ्याला मारहाण केली व अंधारात रस्त्याच्या कडेला नेवून आरोपी सौरभ गायकवाड याने पिडीता हिचेवर बळजबरीने बलात्कार केला. यानंतर पोलीसांची गाडी येत आहे असे दिसल्यावर आरोपी पळुन गेले व जाताना त्यांनी पिडीता व तिचे पतीचा मोबाईल व खिशातील १०,०००/- रूपये बळजबरीने घेऊन घटनास्थळावरून पोबारा केला.

त्यानंतर पोलीस तेथे आल्यानंतर पिडीतेला प्रथम चिंचोडी पाटील येथील दवाखान्यात व तेथुन अहिल्यानगर येथील सरकारी दवाखान्यात दाखल केले व तिथे पोलीसांनी तिचा जबाब नोंदवल्यावर आरोपी सौरभ गायकवाड व इतर दोघे यांचे विरुध्द भा.द.वि.चे कलम ३७६, ३९४ अंतर्गत गुन्हा नोंदवला व सदर गुन्हयाचा तपास अंभोरा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डी. बी. कोळेकर यांनी करून आरोपी सौरभ गायकवाड याचे विरुध्द दोषारोपपत्र बीड येथील सत्र न्यायालयात दाखल केले.

सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे ११ साक्षीदार तपासण्यात आले. पिडीतेचा न्यायालयासमोर जबाब व सरकार पक्षाने सादर केलेल्या भक्कम पुराव्यामुळे व सहाय्यक सरकारी वकील अँड. मंजुषा एम. दराडे यांनी केलेल्या प्रभावी युक्तीवादामुळे न्यायालयाने आरोपी सौरभ गायकवाड यास सदर गुन्हयाकामी दोषी धरून त्याला कलम ३७६ भादवी प्रमाणे १० वर्षे शिक्षा व रूपये १०,०००/- दंड, तसेच कलम ३९४ भा. द. वि. प्रमाणे ७ वर्षे शिक्षा व रु. ५,०००/- दंड तसेच कलम ३२४ भादवि प्रमाणे २ वर्षे शिक्षा तसेच कलम ३२३ भादवि प्रमाणे ६ महिने शिक्षा व ५,०००/- रूपये दंड ठोठावला आहे. सदर प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने अतिरीक्त सरकारी वकील अँड. मंजुषा एम. दराडे यांनी काम पाहिले. त्यांना अतिरिक्त सरकारी वकील अँड. अजय तांदळे यांनी मदत केली व पैरवी म्हणुन महिला पोलीस जेवे यांनी कामकाज पाहिले.

मुख्यमंत्री मोटरसायकलवर...

करण्यासाठी ठोस धोरण आले का ? जर नाही, तर मग सामान्य माणसालाच काटकसरीचे धडे का ?

खरे नेतृत्व फोटोसेशनमध्ये नसते ते धोरणात्मक निर्णयांत असते. जर सरकारला खरोखर इंधन बचत करायची असेल तर राज्यात सक्षम आणि स्वस्त सार्वजनिक वाहतूक उभारावी लागेल. इलेक्ट्रिक वाहनांना व्यवहार्य प्रोत्साहन द्यावे लागेल. ग्रामीण भागातील रस्ते आणि बसव्यवस्था सुधारावी लागेल. शहरांतील वाहतूक व्यवस्थापन वैज्ञानिक पद्धतीने करावे लागेल. अन्यथा मोटरसायकलवरील मुख्यमंत्री हा केवळ कॅमेऱ्यासाठी उभा केलेला प्रसंग ठरेल.

पान १ वरून...

जनता आता प्रतीकांपेक्षा परिणाम पाहते. कारण पेट्रोलपंपावर पैसे भरताना तिला जाहिराती नव्हे, तर वास्तव टोचत असते. मुख्यमंत्री मोटरसायकलवर बसले, हा संदेश असू शकतो पण महाराष्ट्राला आज संदेशांपेक्षा निर्णयांची गरज आहे. हे वास्तव सरकारला कधी लक्षात येणार आहे.

शिवहारे कन्स्ट्रक्शनला....

शेतकरी, रा. बाहेगव्हाण, ता. वडवणी यांचे निवेदन दि.२८.०४.२०२६. शिवहारे कंट्रक्शन व तहसीलदार यांना देण्यात आले होते.

यावेळी कंपनीकडून कसलाही प्रतिसाद न मिळाल्याने तक्रारी निवेदक श्री आसाराम सुदाम नागवे व ईतर शेतकरी, रा. बाहेगव्हाण, ता. वडवणी यांनी संदर्भ क्र.। निवेदनान्वये मौ. बाहेगव्हाण, ता. वडवणी येथे ए.के.शिवहारे कन्स्ट्रक्शन कंपनीचे खदान, हायपॉवर खडी क्रेशर व केमिकल सिमेंट फॅक्ट्रीच्या प्रदूषणामुळे शेतजमीनी नापीकी झालेल्या आहेत. त्यामुळे कंपनीकडून प्रतिएकरी रुपये २५०००/- (अक्षरी दोन लाख पन्नास हजार रुपये) नुकसान भरपाई देण्यात यावी, या मागणीसाठी संबंधीत निवेदक शेतकरी हे दि.०५.०५.२०२६ रोजी ए. के. शिवहारे, कंपनीच्या प्लॉटवर नुकसान भरपाई मिळेपर्यंत सहपरिवार उपोषणास बसलेले होते.

ज्यानुसार प्रकरणामध्ये निवेदनकर्ते यांनी केलेल्या मागणीचे अनुषंगाने तहसिल कार्यालयात प्रथमतः दि. १२.०५.२०२६ रोजी बैठक आयोजित केलेली होती. मात्र सदर बैठकीस आपण अथवा आपला अधिकृत प्रतिनिधी उपस्थित नाहीत. त्यामुळे आपले प्रतिनिधी यांना भ्रमणध्वनी द्वारे विचारणा केली असता सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. तरीही संबंधीत उपोषणकर्ते यांचेसमवेत दि. १४.०५.२०२६ रोजी दूसरी बैठक आयोजित केली. मात्र सदर बैठकीस देखील आपला अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहिलेला नाही. आपले प्रतिनिधीस भ्रमणध्वनीद्वारेही संपर्क साधला असता उपस्थित राहण्यास देखील सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. ही अत्यंत गंभीर स्वरुपाची बाब आहे. सदर प्रकरण हे उपोषण प्राधान्य तसेच संवेदनशिल असून प्रकरणामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असूनदेखील आपण आजरोजीच्या बैठकीस गैरहजर आहात. आपल्या अनुपस्थितीमुळे निवेदक यांचा रोष वाढत आहे, ज्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब निवेदक यांनी निवेदनानुसार सादर केलेल्या मागणीचे अनुषंगाने समाधानकारक मार्ग निघेपर्यंत आपले कंपनीचे मौ. वाहेगव्हाण शिवारातील गट नं.११९ मधील चालू असलेले हायपॉवर खडीक्रेशर या कार्यालयाचे पुढील आदेशापर्यंत तात्काळ आजपासून बंद ठेवण्यात यावे. याची अंमलबजावणी तातडीन आजच न अनुसरल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहिल याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

टेंडर बंद, अवैध वाळू उपसा सुरू : टिप्पर मालका कडून हप्ते वसूल करणारा सवईशाम चर्चेत !

उपविभागीय अधिकारी साहेब श्याम च्या नावाने नदीपात्राची सातबारा करून टाका

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील अनेक वाळू घाटांचे टेंडर बंद असतानाही तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. शासनाकडून अधिकृत वाळू घाट बंद असल्याचे सांगितले जात असताना दुसरीकडे रात्रीच्या अंधारात नदीपात्रातून सर्रास वाळूचे उत्खनन केले जात असल्याची चर्चा सर्वत्र रंगत आहे. विशेष म्हणजे संध्याकाळ होताच काही ठिकाणी जेसीबीच्या सहाय्याने वाळू उपसा सुरू होतो आणि हायवा, टिप्परच्या माध्यमातून ही वाळू थेट माजलगाव शहरासह तालुक्यातील विविध भागात पोहोचवली जात असल्याचे नागरिक सांगत आहेत.

या संपूर्ण अवैध वाळू व्यवसायामागे शाम नावाच्या व्यक्तीचा मोठा हात असल्याचा आरोप आता उघडपणे केला जात आहे. टिप्पर चालकांकडून हप्ते गोळा करून वाळू माफियांना संरक्षण दिले जात असल्याची चर्चा तालुक्यात जोर धरत आहे. शाम यांच्या आशीर्वादाशिवाय एकही टिप्पर हलत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे काही स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

एकीकडे शासन घरकुल लाभार्थी, गोरगरिबांना नियमानुसार वाळू उपलब्ध करून देण्याच्या घोषणा करत आहे. मात्र प्रत्यक्षात सामान्य नागरिकांना बांधकामासाठी वाळू मिळणे कठीण झाले आहे. बाजारात वाळूचे दर गगनाला भिडले असून अवैध वाळू माफियांची मात्र चांदी होत असल्याचे चित्र आहे. गरीब माणूस घर बांधण्यासाठी वाळू शोधत फिरत असताना काही मोजक्या लोकांनी अवैध वाळू व्यवसायातून लाखो रुपयांची कमाई सुरू केल्याचा आरोप होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रात्री उशिरापर्यंत नदीपात्रात मशीनचा आवाज सुरू असतो. काही ठिकाणी महसूल विभाग व पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिच्चून हा अवैध प्रकार सुरू असल्याचा आरोप होत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात हायवा व टिप्पर रस्त्यावरून धावत असतानाही कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे शाम नेमका कोणाच्या आशीर्वादाने एवढा बिनधास्तपणे हप्तेखोरी करत आहे? तो टिप्पर चालकांकडून गोळा केलेले पैसे कुणाकुणाला पोहोचवतो? यामागे कोणते अधिकारी किंवा राजकीय लागेबांधे आहेत का? अशी चर्चा आता गावागावात सुरू झाली आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे गंभीर चौकशीची मागणी केली आहे. शाम याचे मोबाईल कॉल डिटेल्स, लोकेशन, आर्थिक व्यवहार तसेच वाळू माफियांशी असलेले संबंध तपासण्यात यावेत, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्पर चालकांकडून नियमित हप्ते घेतले जात असल्याचा आरोप असल्याने या पैशांचा प्रवाह नेमका कुठे जातो याचाही तपास होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, अवैध वाळू उपशामुळे नदीपात्राचे मोठे नुकसान होत असून पर्यावरणालाही गंभीर धोका निर्माण झाला आहे. नदीकाठची शेती धोक्यात येत असून भूजल पातळीवरही परिणाम होत असल्याचे जाणकार सांगत आहेत. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असताना काही जण मात्र हप्तेखोरीच्या माध्यमातून स्वतःची तिजोरी भरत असल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे.

त्यामुळे जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस प्रशासन व महसूल विभागाने संयुक्त कारवाई करून अवैध वाळू माफियांचा बंदोबस्त करावा, हप्तेखोरी करणाऱ्यांवर कठोर गुन्हे दाखल करावेत आणि सर्वसामान्यांना अधिकृतरीत्या वाळू उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आता माजलगाव तालुक्यातील नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

उपविभागीय अधिकारी साहेब श्यामला सज्ज्यावर नको, हप्ते वसुलीवरच ठेवा?

माजलगाव तालुक्यात वाळू घाटांचे टेंडर बंद असतानाही रात्रीच्या वेळी अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. नदीपात्रातून जेसीबीच्या सहाय्याने वाळू काढून हायवा व टिप्परद्वारे शहरासह तालुक्यात मोठ्या प्रमाणात वाहतूक केली जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे. या संपूर्ण प्रकारामागे श्याम नावाच्या व्यक्तीचा हात असल्याचा आरोप होत असून टिप्पर चालकांकडून हप्ते वसूल करून वाळू माफियांना संरक्षण दिले जात असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांची सजावले व महसुलाची कामे प्रलंबित असताना श्याम हा दोन्ही विभागाचे काम सांभाळत केवळ हप्ते गोळा करण्यात व्यस्त असल्याची चर्चा तालुक्यात सुरू आहे. सामान्य नागरिकांना बांधकामासाठी वाळू मिळत नसताना अवैध वाळू व्यवसाय मात्र जोमात सुरू असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. त्यामुळे श्यामचे कॉल डिटेल्स, आर्थिक व्यवहार व वाळू माफियांशी असलेले संबंध तपासून त्याच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

टेंडर काळातील हप्तेखोरीची होणार सखोल चौकशी ?

माजलगाव तालुक्यात वाळू घाटांचे टेंडर सुरू असताना श्याम याने नेमके कोणाकडून हप्ते गोळा केले आणि ते पैसे कुठल्या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवले याची आता सखोल चौकशी होण्याची चर्चा सुरू झाली आहे. अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्पर चालकांकडून नियमित वसुली करण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे श्यामचे आर्थिक व्यवहार, मोबाईल कॉल डिटेल्स, लोकेशन तसेच वाळू माफियांशी असलेले संबंध तपासण्याची मागणी जोर धरत आहे. महसूल विभाग व संबंधित अधिकाऱ्यांशी त्याचे लागेबांधे होते का, याचीही चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विनापरवाना

शेतमाल खरेदी – विक्री करणा–यांवर कारवाई होणार– सभापती जयदत्त नरवडे

माजलगाव ।प्रतिनिधी

शेतक–यांच्या व्यापक हिताचे संरक्षण आणि कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विनापरवाना शेतमाल खरेदी – विक्री करणा–यांवर कारवाई होणार असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी – विक्री व्यवहाराचे नियमन करण्यात येते. परंतु तालुक्यातील काही ग्रामीण भागात अनेक व्यापारी, संस्था तसेच काही शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्याही परवान्याविना शेतमाल खरेदी – विक्री करत असल्याचा प्रकार घडत आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येणार आहे. माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने यासंदर्भात परिपत्रक जाहिर केले असून संबंधितांना वेळोवेळी सुचना देवुनही काही व्यापारी व संस्था विनापरवाना व्यवहार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता कायद्यानुसार आवश्यक परवाना घेतल्याशिवाय शेतमाल खरेदी – विक्रीचा व्यवसाय करता येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे. मा.पणन संचालक यांचे दि. ०८ मे २०२६ व मा. जिल्हा उपनिबंधक कार्यालय बीड यांचे पत्र दि. ११ मे २०२६रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमाल व्यापारासाठी परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विना परवाना शेतीमाल खरेदी – विक्री करणा–या व्यापा–यांवर कारवाई करण्याचा ईशारा बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी दिला आहे.

एकशे वीस कुटूंबांना जीवनावश्यक वस्तुंचे वितरण

लोकसहभागातून मानवलोकचा पुढाकार

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

मानवलोक जनसहयोगच्या वतीने लोकसहभागातून १२० वयोवृद्ध निराधार कुटुंबांना जीवनावश्यक वस्तुचे वितरण करण्यात आले. यावेळी अमित रादंड, ज्ञानोबा कुकडे, मानवलोक परिवाराचे अण्णासाहेब रोहम, भागवत कांबळे, अरूण आसरडोहकर आदी उपस्थित होते. यावेळी अमित रांदड म्हणाले की, वृद्ध व निराधारांना वयाच्या सरत्या शेवटी धडपड होत नाही त्यांची शेवटी उपासमार होऊ नये ज्यांना आधार नाही त्यांना उदरनिर्वाह भागविण्यासाठी पर्याय नाही तेव्हा मानवलोकच्या माध्यमातून बाबुजींनी उपक्रम सुरू केला.

ज्ञानोबा कुकडे म्हणाले की,माझ्या वडिलांच्या स्मृती दिनी मी तुमच्या रूपात त्यांना पाहतो खरे तर जीवनावश्यक वस्तु वाटपाची वेळ यावी ही कल्पना करवत नाही पण पुढील पिढीकडून सांभाळ होत नाही म्हणून ही व्यवस्था आहे. मुलांनी आई वडिलांचा सांभाळ करण्याचे आवाहन कुकडे यांनी केले.

अण्णासाहेब रोहम यांनी बाबूजींनी निराधार वृद्ध यांच्यासाठी ही योजना सुरू केली त्यामुळेच हे वृद्ध निराधार हाल अपेष्टात न जगता चांगल्या प्रकारचे जीवन जगत असल्याचे सांगितले. शाम सरवदे यांनी संचलन करून आभार मानले कार्यक्रमासाठी संजना आपेट,सावित्री सगरे आदीसह इतरांनी परिश्रम घेतले.

रविवारी हभप वासुदेव बाबा टाकळीकर यांचे कीर्तन

कै.द्रौपदी सोळंके यांच्या तेरावीनिमित्त रविवारी कीर्तन सेवेचे आयोजन

मोहिखेड । प्रतिनिधी

मोहिखेड येथील जुन्या पिढीतील ज्येष्ठ नागरिक द्रौपदी व्यंकटराव सोळंके यांचे वयाच्या १०४ व्या वर्षी दि. ४ मे २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली होती. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व तेरावीनिमित्त समस्त सोळंके परिवाराच्या वतीने धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.याअंतर्गत रविवार दि. १७ मे २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत हभप वासुदेव बाबा टाकळीकर महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. या कीर्तनातून अध्यात्म, भक्ती आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला जाणार असल्याने परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.कीर्तन सेवे नंतर उपस्थित भाविकांसाठी गोड जेवण व महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. या धार्मिक कार्यक्रमास परिसरातील नागरिक, नातेवाईक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली.

कै. द्रोपदीबाई व्यंकटराव सोळंके वृद्ध दि.4.05.2026.

या कीर्तन सेवेचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सुरेश व्यंकटराव सोळंके, श्रीमंत व्यंकटराव सोळंके आणि मंजुळदास व्यंकटराव सोळंके यांनी केले आहे.

ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयात ह.भ.प.रत्नाकरराव धाट यांचे व्याख्यान संपन्न

बीड । प्रतिनिधी

ग्रंथ हे जीवनासाठीचे उत्तम मार्गदर्शक असतातच, वाचेल तो वाचेल, हे सत्य आहेच. वाचन चळवळीचे स्वरूप बदलते आहे.. तेही स्वीकारले जाते. वाचनासोबतच ग्रंथाचा अभ्यास, चर्चा, चिंतन हा उपक्रम आपण हाती घेतलेला आहे. त्याअनुषंगानेच ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयाच्या ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गात बुधवार दि. १३-०५-२०२६ रोजी सायं. ६.०० ते ७.०० या वेळेत वाचनालयाच्या सभागृहात ह.भ.प. रत्नाकरराव धाट यांचे ज्ञानेश्वरीवर चिंतन संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पुजन प्रमुख व्याख्याते ह.भ.प. रत्नाकरराव धाट, कार्यकारी मंडळाचे सरचिटणीस ॲड. गोविंद कासट, श्री. मधुकरराव वैद्य यांच्या हस्ते संपन्न झाले. यानंतर प्रमुख वक्ते ह.भ.प. रत्नाकरराव धाट यांचे स्वागत कार्यकारी मंडळाचे सरचिटणीस ॲड. गोविंद कासट यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.

यानंतर प्रमुख व्याख्याते ह.भ.प. रत्नाकरराव धाट यांनी ज्ञानेश्वरी व्याख्यानमाला या मालेत ४४ वे पुष्प गुंफतांना ज्ञानेश्वरीच्या चौथ्या अध्यायावर विस्तृतपणे निरुपण केले. आपल्या एक तासाच्या चिंतनात त्यांनी अनेक प्रकारचे दाखले देत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमास डॉ. जी.एम. कुलकर्णी, श्री. संजय विडेकर, कुलकर्णी जे.बी., चौसाळकर संजय, डॉ. मंगेश वालेवाडीकर, क्षीरसागर दत्तात्रय, सौ. स्नेहलता सुधीर देशमुख, डॉ. मंगेश वालेवाडीकर, रविंद्र भुसारी, प्रा. रघुनाथराव कदम, राजेंद्र कदम, पवार अरुण, श्रीराम देशमुख, यांच्यासह वाचक, सभासद, कर्मचारी वृंद आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सदरील कार्यक्रम विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्री. अमोलकचंदजी सुराणा, उपाध्यक्षा डॉ. रोहिणीताई वैद्य, सदस्य ॲड. कालीदासनाना थिगळे, डॉ. हेमलता पाटील, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर, सरचिटणीस ॲड. गोविंद कासट यांच्यासह कार्यकारी मंडळातील पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वतेसाठी बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक तथा ग्रंथपाल ग्रंथमित्र गणेश शेंडगे, किशोर ठोसर, कुमार देशमुख, संतोष जगताप, रमेश जोशी, रामेश्वर जाधव यांनी परिश्रम घेतले.

सेवानिवृत्त मुख्याध्यापक उस्मान खान पठाण यांचे निधन

सायं.दैनिक बीड किसानचे कार्यकारी संपादक अदनान खान यांना पितृशोक

बीड ।प्रतिनिधी

सायं. दैनिक बीड किसानचे कार्यकारी संपादक अदनान खान पठाण यांचे वडील सेवानिवृत्त मुख्याध्यापक उस्मान खान पठाण यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांची नमाज़ ए जनाज़ा दिनांक १४ मे २०२६ गुरुवार रोजी दुपारी ३:०० वाजता बालेपीर दरगाह मस्जिद येथे पठण करण्यात आली तर दरगाह कब्रस्तान येथेच दफनविधी करण्यात आला. मृत्यू समयी त्यांचे वय ७६ वर्ष होते.

उस्मान खान सर हे प्रथम सहशिक्षक म्हणून शिक्षण विभागात रुजू झाले होते. शैक्षणिक गुणवत्तापूर्ण शिक्षण व मार्गदर्शन विद्यार्थ्यांना देऊन चांगले विद्यार्थी घडवीत असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना काही वर्षातच मुख्याध्यापक पदी पदोन्नती मिळाली होती. विद्यार्थ्यांना नेहमी चांगले दर्जेदार शिक्षण मिळावे हाच ध्यास त्यांना नेहमी असायचा. विद्यार्थ्यांना ते आपल्या मुलांप्रमाणे जीव लावायचे. शिक्षक म्हणून ते जेवढे कर्तव्यदक्ष होते तेवढेच कठोर निर्णय घेणारे म्हणूनही प्रसिद्ध होते. शाळा, शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक कठोर निर्णय सुद्धा घेतले होते म्हणून ते सेवेत असताना आणि सेवानिवृत्त झाल्यावरही समाजात तेवढेच लोकप्रिय होते.

गेल्या काही काळापासून वृद्धापकाळाने आजारी असल्याने त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते परंतु त्यांच्या शरीराने उपचारांना साथ न दिल्याने त्यांची प्राणज्योत अखेर मालवली. त्यांच्या निधनाने खान कुटुंबीयांनी घरातला कर्ता पुरुष आणि समाजाने एक चांगला सुहृदयी हाडाचा शिक्षक गमावला. त्यांच्या पश्चात तीन मुली–जावई, एक मुलगा–सून आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे खान कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना मिळणार शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तके- दयानंद सुरवसे

लातूर ।प्रतिनिधी

समग्र शिक्षा,जिल्हा परिषद,लातूर अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वितरित करणाऱ्या वाहनाच्या वाहनाला हिरवा झेंडा दाखवून वाहतुकीचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा सभापती,शिक्षण समिती,जिल्हा परिषद,लातूर मा. श्री दयानंद सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती तृप्ती अंधारे या उपस्थित होत्या.

सन २०२६-२७ या वर्षात जिल्ह्यातील मराठी माध्यमाच्या २,०४,९०३,सेमी माध्यमाच्या १८२ व उर्दू माध्यमाच्या २६,३३१ अशा एकूण २३१४१६ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक शाळेच्या पहिल्या दिवशी वितरित करण्यात येणार आहेत त्यासाठी बालभारती, विभागीय मंडळ, लातूर येथून सदर पुस्तके तालुकास्तरावर व तालुका स्तरावरून ते शाळा स्तरावर वितरित करण्याची नियोजित आहे.

पाठ्यपुस्तक तालुकानिहाय वाटप पुढीलप्रमाणे होणार आहे.लातूर-८१३०५,अहमदपूर- २६३०२, औसा- २७३६९,निलंगा-३०७११,उदगीर- ३६८९५,चाकूर-१६३७४,रेणपुर-१०१८०,देवणी-७६३५,जळकोट-८५१३ व शिरूर अ. -६१३२

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार यावर्षी इयत्ता दुसरी,तिसरी,चौथी व सहावी या वर्गाचा अभ्यासक्रम बदलल्यामुळे नवीन अभ्यास क्रमानुसार पाठ्यपुस्तके हे विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत.

सदरील कार्यक्रमास बालभारती, विभागीय मंडळाचे श्री.सचिन आलडवाड,भांडार व्यवस्थापक लातूर,श्रीकिशोर जाधव,सहाय्यक निर्मिती अधिकारी,श्री दिपक कुंभार,भांडार अधीक्षक तसेच श्री दिपक गलांडे, रवी औसेकर, चेतन वाल्मिकी,श्री चौळे उपस्थित होते. तसेच पाठ्यपुस्तक वाटपाचे नियोजन समग्र शिक्षा अभियान या कार्यालयामार्फत करण्यात येत असून त्या कार्यालयाचे श्री. सतीश भापकर,रउफ शेख,श्री.चंद्रकांत ठाकरे श्री.दत्तात्रय माळकर, श्री.सुनील राजुरे,श्री.गोविंद भोळे,श्री.योगिराज आमगे इत्यादी अधिकारी कर्मचारी सदर उपक्रमाचे नियोजन करत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आजच्या बैठकीचे आवाहन अनाधिकृत - अविनाश नाईकवाडे

बीड ।प्रतिनिधी

आज काही माध्यमांमध्ये व सोशल मीडियावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड जिल्हाच्या नावाने पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीसंदर्भात एक बातमी आणि आवाहन मोठ्या प्रमाणावर प्रसारित करण्यात आले. मात्र सदर पोस्टमध्ये कोणत्याही अधिकृत जबाबदार पदाधिकाऱ्यांची स्वाक्षरी, अधिकृत प्रसिद्धीपत्रक क्रमांक, संघटनात्मक मान्यता अथवा जिल्हा पक्ष कार्यकारिणीची अधिकृत नोंद स्पष्टपणे नमूद करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे ही माहिती पक्षाच्या अधिकृत माध्यमांतून देखील प्रसिद्ध करण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

याहून अधिक गंभीर बाब म्हणजे ज्या व्यक्तीने हे कथित निवेदन प्रसिद्धीस आणले आहे, ती व्यक्ती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये कोणत्याही जबाबदार संघटनात्मक किंवा अधिकृत पदावर कार्यरत नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अशा प्रकारे पक्षाच्या नावाचा वापर करून जिल्ह्याच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण करणे, स्वतःची राजकीय प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करणे आणि संघटनात्मक वातावरण दूषित करणे हे अत्यंत निषेधार्ह आहे.

पक्ष संघटनेच्या नियमांनुसार संवाद बैठका, कार्यकर्ता मेळावे, संघटनात्मक आवाहने किंवा अधिकृत कार्यक्रमांची घोषणा करण्याचा अधिकार हा केवळ जिल्हाध्यक्ष व जिल्ह्याच्या प्रमुख पदावर असेलेल्या पदाधिकाऱ्यांनाच असतो. कोणत्याही पंचायत समिती सभापती, नगर परिषद सभापती, आमदार, खासदार, नगरसेवक किंवा इतर लोकप्रतिनिधींना तसेच विविध आघाड्या व इतर आघाड्यांना स्वतंत्रपणे अशा प्रकारे जिल्ह्याची बैठक बोलावण्याचा किंवा अधिकृत आवाहन करण्याचा अधिकार नसतो, याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घ्यावी. विशेषतः पक्षात नव्याने आलेल्या व्यक्तींनी ही बाब जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

आज सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा, अपूर्ण माहिती आणि दिशाभूल करणारे संदेश काही क्षणांत हजारो लोकांपर्यंत पोहोचतात. मात्र अशा कृतींमुळे सर्वात मोठा धक्का बसतो तो निष्ठावान कार्यकर्त्यांच्या विश्वासाला. संघटना ही व्यक्तीपेक्षा मोठी असते आणि कार्यकर्त्यांचा सन्मान हा कोणत्याही पक्षाचा खरा पाया असतो.

म्हणून बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, महिला आघाडी, युवक-युवती आघाडी, विविध फ्रंटल सेलचे सदस्य, कार्यकर्ते आणि पक्षाशी निष्ठा ठेवणाऱ्या सर्वांनी कोणत्याही अप्रमाणित व अनधिकृत माहितीवर विश्वास ठेवू नये. पक्षाच्या अधिकृत बैठका, कार्यक्रम आणि निर्णयांविषयीची माहिती नेहमी अधिकृत माध्यमांतूनच जाहीर केली जाते व जाईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

संघटना मजबूत ठेवायची असेल तर शिस्त आवश्यक आहेविश्वास टिकवायचा असेल तर पारदर्शकता आवश्यक आहेआणि कार्यकर्त्यांचा सन्मान राखायचा असेल तर अधिकृततेचा आदर आवश्यक आहेआणि हे जर आपल्याला शिकायचे असेल तर मा. अमरसिंहजी पंडित साहेब तसेच मा. धनंजयजी मुंडे साहेब यांच्याकडून शिकावे.संयम ठेवासजग राहाआणि केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष अविनाश नाईकवाडे यांनी केले आहे.

पदाधिकारी व कार्यकर्ते संवाद बैठकीस उपस्थित रहा - शेख निजाम

बीड ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अँड.राजेश्वर चव्हाण व आमदार विजयसिंह पंडित सह प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत आज १५ मे रोजी सकाळी दहा वाजता जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला पक्षाच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शेख निजाम यांनी केले आहे.

आज दिनांक १५ मे २०२६ वार, शुक्रवार रोजी सकाळी ठिक १० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा कार्यालय,मित्र नगर चौक,बीड येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन केले आहे या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बीड जिल्ह्यातील आजी माजी आमदार, खासदार,प्रदेश पदाधिकारी,सर्व तालुकाध्यक्ष- शहराध्यक्ष,विधानसभा अध्यक्ष,महिला,युवक,युवती, सर्व फ्रंटल सेल चे अध्यक्ष व कार्यकारणी तसेच जिल्हा कार्यकारणी, नगराध्यक्ष, नगरसेवक, प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने या बैठकीत उपस्थित रहावे असे आवाहन शेख निजाम, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अल्पसंख्यांक) तथा सभापती- स्वच्छता व आरोग्य न प.बीड यांनी केले आहे.



यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

बीड ।प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

प्राचार्य डॉ. बापुराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, विद्वत्ता आणि राष्ट्रनिष्ठेचा गौरव करत विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यात मतदार याद्यांची 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहीम

२०.३६ लाख मतदारांच्या घरी पोहोचणार निवडणूक यंत्रणा

लातूर ।प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष सखोल पुनरिक्षण' (एसआयआर) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून या मोहिमेंतर्गत लातूर जिल्ह्यातील सुमारे २० लाख ३६ हजार मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

बीएलओच्या प्रत्यक्ष घरांना भेटी...

महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात लातूर जिल्ह्यातील सुमारे २० लाख ३६ हजार मतदारांच्या तपशिलाची खातरजमा २ हजार १४२ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले 'बूथ लेव्हल एजंट्स' (बीएलए) त्यांना सहकार्य करणार आहेत.

जनगणनेच्या कामाशी सांगड

सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल.

लातूर जिल्ह्यासाठी महत्त्वाचे वेळापत्रक

दिनांक २० ते २९ जून २०२६ या कालावधील बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करण्यात येईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येतील. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल, तसेच ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती नोंदविता येतील आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिद्ध करण्यात येईल.

राजकीय पक्षांना आवाहन

भारत निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट (बीएलए) नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे.

लातूर जिल्ह्यातील विधानसभा क्षेत्रनिहाय मतदार संख्या-

लातूर ग्रामीण- ३३२०११ लातूर शहर- ३९९१०५ अहमदपूर- ३४५३६० उदगीर (अ.जा.)- २३५६५

निलंगा- ३३३३९१ औसा- ३०३२०९

छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य: नगर परिषदेकडून परळीत मराठा भवनसाठी २८ गुंठे जागा प्रदान ; आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते जागा हस्तांतरित !

परळी वैजनाथ, प्रतिनिधी.....

परळी वैजनाथ शहरात मराठा भवन उभे राहावे अशी गेल्या अनेक वर्षांपासून ची सकल मराठा समाजाची मागणी होती. ना.पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगरपरिषदे कडून मराठा भवनसाठी २८ गुंठे जागा देण्यात आली आहे. स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य साधत आज माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते नामफलकाचे अनावरण करत ही जागा मराठा भवनसाठी हस्तांतरित करण्यात आली आहे.

वैद्यनाथ मंदिर परिसरात नंदागौळ रस्त्यावर वेताळ मंदिराच्या बाजूला असलेली २८ गुंठे जागा नगरपरिषदेकडून मराठा भवनसाठी नियोजित करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून परळी मध्ये मराठा भवन असावे अशी मराठा समाजाची आग्रही मागणी होती. आता मराठा भवनसाठी ही जागा हस्तांतरित करण्यात आली आहे.लवकरात लवकर सुसज्ज मराठा भवन उभे राहील अशी भूमिका मराठा समाज बांधवांनी व्यक्त केली. या अनुषंगाने आज संबंधित ही २८ गुंठे जागा माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते हस्तांतरित करण्यात आली. यावेळी स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती

निमित्त प्रतिमेचे पूजन व नियोजित मराठा भवनच्या नाम फलकाचे अनावरण आ.धनंजय मुंडे, नगराध्यक्ष सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, न. प. गटनेते वैजनाथ सोळंके, नगरसेवक व्यंकटेश शिंदे, श्रीकृष्ण कराड, नितीन बागवाले, अनंत इंगळे, प्रा.शंकर कापसे, देवराव लुगडे, नितीन शिंदे, सेवकराम जाधव, उत्तम माने, उत्तम मोरे, इंजि. संजय देशमुख, राजेश ठोंबरे शिवाजी देशमुख, बाबा शिंदे, महादेव गंगणे, दिलीप माने, वैजनाथ सुरवसे, सचिन मराठे,प्रल्हाद सुरवसे, शरद चव्हाण, गिरीश भोसले, डॉक्टर प्रा.पी.एल.कराड, राजेंद्र सोनी, रमेश चौंडे, विजयकुमार खोसे ,न. प. उपमुख्य अधिकारी संतोष रोडे, नगर अभियंता ढवळे आदींसह सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी परळीत देखणे मराठा भवन उभे राहील असा विश्वास मराठा समाज बांधवांनी व्यक्त केला. मराठा भवनसाठी ही जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल सकल मराठा समाजाच्या वतीने आमदार धनंजय मुंडे व नगराध्यक्ष सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. सकल मराठा समाजाच्या वतीने परळी नगर परिषदेचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

मराठा भवन मध्ये काय आहे प्रस्तावित?.

दरम्यान,सकल मराठा समाजाच्या वतीने परळी येथे उभारण्यात येणाऱ्या मराठा भवन मध्ये समाज उपयोगी उपक्रम राबवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मुला मुलींचे वसतीगृह, शिकवणी क्लासेस, अभ्यासिका, नोकरी मार्गदर्शन केंद्र आदी विद्यार्थी कलागुण विकसित करण्यासाठीचे उपक्रम या भवन मधून राबवण्यात येणार आहेत. उद्योग, व्यवसाय मार्गदर्शन, व्यवसायातील बारकावे, येणारी आव्हाने, उद्योजक, व्यावसायिकांचे परिचय मेळावे आदी आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर वधू-वर परिचय मेळावे, सामूहिक विवाह कार्य, शिक्षण, आरोग्य, कौटुंबिक, सामाजिक ,व्यावसायिक यासह अनेक विषयावर प्रबोधन मार्गदर्शन मिळावे आयोजित करण्यासाठी मराठा भवन उपयुक्त ठरणार आहे. सर्व गुणसंपन्न पिढी घडविण्याच्या दृष्टिकोनातून ही वास्तू एक महत्त्वाचे केंद्र ठरणार असल्याचा संकल्प मराठा भवनच्या उभारणीत करण्यात आलेला आहे.

खरीप हंगामासाठी आवश्यक सज्जता ठेवावी-पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले



लातूर ।प्रतिनिधी

भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार २०२६ च्या मान्सूनवर 'एल-निनो'चा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आगामी खरीप हंगामात उद्भवणाऱ्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक सज्जता ठेवावी. तसेच शेतकऱ्यांना पेरणी, बियाणे व खत वापर याविषयी योग्य मार्गदर्शन करावे, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या.

खरीप हंगाम पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. विधान परिषद आमदार तथा मुख्य प्रतोद विक्रम काळे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम यांच्यासह पशुसंवर्धन विभाग, अग्रणी बँक, आत्मा, वन आदी विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत

१९ मे रोजी जिल्हास्तरीय विशेष कार्यशाळेचे आयोजन

लातूर ।प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे लातूर जिल्हा कार्यालय, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय आणि जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मातंग समाजातील १२ पोटजातींमधील बांधवांसाठी १९ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता एक दिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसरातील शासकीय मुलांचे वसतिगृह अभ्यासिका हॉल होणार आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गातील मातंग समाजाच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. या योजनांची माहिती समाजातील सर्व घटकापर्यंत पोहोचावी आणि जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, या उद्देशाने या विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यशाळेत समाज कल्याण विभाग आणि जिल्हा परिषद समाज कल्याण विभागांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध वैयक्तिक आणि सामूहिक लाभ योजनांची सविस्तर माहिती दिली जाईल. तसेच महामंडळामार्फत मिळणारे कर्ज, शैक्षणिक सवलती आणि रोजगाराच्या संधींबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. मातंग समाजातील युवक-युवती आणि गरजू लाभार्थ्यांनी या कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय योजनांची माहिती घ्यावी, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक

परळीत १८ मे रोजी दहावी-बारावी पास गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

परळी ।प्रतिनिधी

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत विशेष प्राविण्यासह पास झालेल्या परळी शहरातील सर्व गुणवंत विद्यार्थांच्या दिनांक १८ मे २०२६ रोजी परळी येथील लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिरात, सांय.५:३० वा सत्काराचे व करिअर गाईडन्स कार्यकमाचे आयोजन परळी भिमजयंती महोत्सव समिती व नालंदा फाऊन्डेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे.

दहावी व बारावी नंतर कोणत्या करिअर ऑपशन निवडाव्या, यासंदर्भात विद्यार्थी व पालक गोंधळलेले असतात किंवा अनभिज्ञ असतात, त्यामुळे या सत्कार कार्यक्रमात विद्यार्थांना करीअर गाईडन्स सुद्धा करण्यासाठी तज्ञ मंडळीना पाचारण करण्यात येणार आहे. दहावीत ज्यांना कमीत कमी ७५% गुण व बारावीत कमीत कमी (कोणत्याही शाखेत) ६५% गुण प्राप्त असतील त्यांनी खाली दिलेला मो नं. वर अथवा त्या ठिकाणी संपर्क करावा व गुणपत्रिकेची झेरॉक्स जमा करावी.

गुणवत्ता प्राप्त विद्यार्थांना प्रमाणपत्र, ट्राफी व वस्तू स्वरुपात भेट देण्यात येणार आहे तसेच या सत्कार कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील नामांकित प्रमुख मार्गदर्शक व करिअर गाईड उपस्थित राहून विद्यार्थांना व पालकांना मार्गदर्शन करणार आहेत.

तरी विद्यार्थ्यांनी मिलिंद विद्यालय तथा मिलिंद ज्यू कॉलेज परळी येथे रोज सकाळी १० ते ११:३० यावेळेत प्रा विलास रोडे (९४२३७१४४६४), नितीन व्हावळे सर, प्रा दासू वाघमारे (पंच शिलनगर) ८७८८०२७२२९, बाबासाहेब पाचांगे साहेब, (माधवबाग) ९५९५७७९७८० यांना संपर्क करून नाव नोंदणी करावी, किंवा फोनकरून नोंदणी करावी. ऐनवेळी नावे स्विकारली जाणार नाहीत.

तरी सर्व विद्यार्थी व पालकांनी या सत्कार सोहळ्यास उपस्थित रहावून कार्यक्रम यशस्वी करावा व आपल्या यशाची गुरुकिली येथे सापडण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन संयोजक मंडळाने केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).

सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात कायम धावणारे मा.जि.प.सदस्य देविदास आबा धस

जनसामान्यांचा हक्काचा नेता:जनसेवेची अखंड धडपड

आष्टी (एस.राजेंद्र लाड)

राजकारण हे केवळ पद, प्रतिष्ठा आणि निवडणुकांपुरते मर्यादित नसून जनतेच्या प्रत्येक सुख-दुःखात सहभागी होणे, त्यांच्या अडचणी स्वतःच्या समजून सोडविण्यासाठी झटणे आणि समाजाशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण करणे ही खरी लोकसेवा असते. याच तत्वावर काम करत मतदारसंघात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे नाव म्हणजे मा. जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस. गेल्या अनेक वर्षांपासून मतदारसंघातील जनतेशी त्यांनी जपलेले आत्मीयतेचे नाते आजही अधिक घट्ट होताना दिसत आहे. उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असतानाही आबांचा जनसंपर्क दौरा मात्र अखंड सुरू असून, प्रत्येकाच्या घरातील आनंद-दुःखात सहभागी होण्यासाठी ते सातत्याने धाव घेत आहेत.

राजकीय कार्यक्रम असो, शैक्षणिक कार्यक्रम असो, धार्मिक सोहळा असो किंवा एखाद्या सर्वसामान्य कुटुंबातील घरगुती कार्यक्रम असो, देविदास आबा धस यांची उपस्थिती हमखास पाहायला मिळते. मतदारसंघातील लग्न विवाह सोहळे, वास्तुशांती कार्यक्रम, जागरण गोंधळ, अखंड हरिनाम सप्ताह, अमृत महोत्सव, वाढदिवस सोहळे, सत्कार समारंभ, उद्घाटन कार्यक्रम यामध्ये आबा अत्यंत आत्मीयतेने सहभागी होत असतात. विशेष म्हणजे केवळ मोठ्या कार्यक्रमांपुरते त्यांचे कार्य मर्यादित नसून सामान्य कार्यकर्त्यांच्या घरातील छोट्याशा कार्यक्रमालाही ते आवर्जून उपस्थित राहतात. त्यामुळेच मतदारसंघातील नागरिक आबा म्हणजे आपल्या घरातीलच माणूस अशी भावना व्यक्त करताना दिसतात.

देविदास आबा धस यांचा जनसंपर्क किती मोठा आहे याचा प्रत्यय त्यांच्या दैनंदिन दौऱ्यावरून येतो. एका दिवसात तब्बल ६० ते ६५ लग्न समारंभांना उपस्थित राहण्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंदविला गेला आहे. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत विविध गावांमध्ये सुरू असलेल्या कार्यक्रमांना भेटी देत प्रत्येक कुटुंबाशी संवाद साधणे, शुभेच्छा देणे आणि त्यांच्या आनंदात सहभागी होणे ही त्यांची कार्यपद्धती आजही कायम आहे. त्यामुळे मतदारसंघातील प्रत्येक गाव, वाडी-वस्ती आणि सर्वसामान्य कुटुंबाशी त्यांनी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले आहे.

सामाजिक बांधिलकी जपत जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी आबा नेहमीच आघाडीवर असतात. जमिनी खरेदी-विक्री व्यवहारातील अडचणी, स्थावर मालमत्तेचे वाद, शासकीय कार्यालयातील प्रलंबित कामे, तहसील व पंचायत समितीमधील प्रश्न, विद्यार्थ्यांच्या कॉलेजमधील अडचणी, शिष्यवृत्ती किंवा कागदपत्रांची कामे अशा विविध समस्यांसाठी नागरिक सर्वप्रथम आबांकडे धाव घेतात. कोणतीही समस्या असो, ती तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे, नागरिकांना योग्य मार्गदर्शन करणे आणि आवश्यक त्या ठिकाणी स्वतः उपस्थित राहून प्रश्न निकाली काढणे ही त्यांची खास कार्यशैली आहे.

आरोग्य क्षेत्रातही त्यांची संवेदनशीलता विशेष जाणवते. हॉस्पिटलमध्ये दाखल असलेल्या रुग्णांना भेट देणे, त्यांची विचारपूस करणे, गरजू रुग्णांचे बिल कमी करून देण्यासाठी मदत करणे, डॉक्टर व प्रशासनाशी चर्चा करून उपचारांमध्ये मदत उपलब्ध करून देणे अशा अनेक सामाजिक कार्यांमुळे अनेक कुटुंबांना मोठा आधार मिळाला आहे. गरीब आणि गरजू कुटुंबांसाठी ते नेहमीच मदतीचा हात पुढे करत असल्याने नागरिक त्यांच्याकडे मोठ्या विश्वासाने पाहतात.

लग्न विवाह जुळविण्याच्या सामाजिक कार्यातही देविदास आबा धस यांचा मोठा सहभाग राहिला आहे. अनेक कुटुंबांना योग्य स्थळ मिळवून देणे, गैरसमज दूर करून संसार उभा राहण्यासाठी पुढाकार घेणे अशा माध्यमातून त्यांनी अनेकांचे संसार घडविण्याचे काम केले आहे. त्यामुळे समाजातील विविध घटकांमध्ये त्यांच्याविषयी विशेष आत्मीयता निर्माण झाली आहे.

एखाद्या कुटुंबात दुःखद घटना घडली तरी आबा तातडीने त्या कुटुंबाच्या भेटीला पोहोचतात. अंत्यसंस्कार, दशक्रिया विधी किंवा दुःखद प्रसंगी कुटुंबीयांचे सांत्वन करून त्यांना मानसिक आधार देण्याचे काम ते अत्यंत संवेदनशीलतेने करतात. त्यामुळे सुखातच नव्हे तर दुःखातही सोबत उभे राहणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

देविदास आबा धस यांचे व्यक्तिमत्त्व हे रांगडे, स्पष्टवक्ते आणि ठसकेबाज म्हणून ओळखले जाते. त्यांच्या बोलण्यात नेहमीच थेटपणा आणि स्पष्टता दिसून येते. मात्र त्याचबरोबर मनाने अत्यंत हळवे आणि लोकांच्या प्रश्नांबाबत तळमळ असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. राजकीय क्षेत्रात काम करत असताना त्यांनी कधीही सर्वसामान्य जनतेपासून अंतर ठेवले नाही. उलट प्रत्येक व्यक्तीशी आपुलकीने संवाद साधत त्यांनी विश्वासाचे नाते निर्माण केले आहे.

आजच्या काळात अनेक लोकप्रतिनिधी केवळ राजकीय कार्यक्रमांपुरते मर्यादित राहतात. मात्र देविदास आबा धस हे प्रत्येक सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि वैयक्तिक कार्यक्रमात सहभागी होत जनतेशी सतत जोडलेले राहतात. मतदारसंघातील नागरिकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी दिवस-रात्र उपलब्ध राहणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत जपलेले हे आत्मीयतेचे नातेच त्यांच्या लोकप्रियतेचे खरे गमक मानले जात आहे.

जालना जिल्ह्याचा साहित्यिक मान उंचावला

उद्योजक सुदामराव सदाशिवे व ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रभाकर शेळके यांना पद्मपाणि राज्य पुरस्कार जाहीर

भोकरदन इसरारखान पठाण

जालना जिल्ह्याच्या साहित्य सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरणारी घोषणा करण्यात आली असून बीड जिल्ह्यातील प्रतिष्ठित पद्मपाणि संस्थेच्या वतीने दिला जाणारा मानाचा पद्मपाणि राज्य पुरस्कार यंदा जालना जिल्ह्यातील उद्योजक सुदामराव सदाशिवे आणि ज्येष्ठ साहित्यिक, कवी, कथाकार व नाट्यलेखक डॉ. प्रभाकर कडूबा शेळके यांना जाहीर करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे साहित्य, समाजकारण आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांना दिला जाणारा हा पुरस्कार यंदा सतराव्या वर्षात प्रवेश करत असून जालना जिल्ह्याच्या वैभवात भर घालणारा हा सन्मान मानला जात आहे.

दि. १७ मे रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीईओ जतिन रहेमान राहणार असून तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या हस्ते राज्य व राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण होणार असल्याची माहिती पद्मपाणि संस्थेचे अध्यक्ष तथा संयोजक दिलीपराज तरकसे, सचिव सिंधू तरकसे आणि राजकुमार वाघमारे यांनी दिली.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रभाकर शेळके यांनी आपल्या साहित्यिक लेखनातून ग्रामीण जीवन, सामाजिक वास्तव आणि मानवी संवेदनांचा प्रभावी वेध घेत साहित्य क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. तर उद्योजक सुदामराव सदाशिवे यांनी सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य उभे केले आहे.

या दुहेरी सन्मानामुळे जालना जिल्ह्याच्या साहित्यिक व सामाजिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, भोकरदन-जाफराबाद परिसरातील अनेक मान्यवरांनी दोघांवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

युवा नेते सुधाकरजी दानवे यांनी दोन्ही मान्यवरांचे अभिनंदन करत हा पुरस्कार संपूर्ण जालना जिल्ह्यासाठी गौरवाचा क्षण असल्याचे म्हटले. तसेच सौ. सुनीता शेळके-काटकर, रामभाऊ शेळके, रमेश शेठ सपकाळ, दुर्गेश शेळके, पूजा विश्वनाथ गायकवाड, प्रा. अंकुश जाधव, प्रा. राजेंद्र देशमुख, कुलदीप रूघे, विजय बाविस्कर आणि अनिरुद्ध पावसे यांनीही शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

मंठ्यात वाळू माफियांवर महसूल प्रशासनाचा सर्जिकल स्ट्राईक

उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड व तहसीलदार सुमन मोरे यांची धडक कारवाई बिना रॉयल्टी वाळू वाहतूक करणारा मिनी हायवा जप्त

परतूर ।पिराजी गायकवाड

मंठा तालुक्यात अवैध वाळू माफियांच्या मुसक्या आवळण्यासाठी महसूल प्रशासन अखेर आक्रमक झाले असून परतूर उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मंठा तहसीलदार सुमन मोरे यांच्या नेतृत्वात महसूल विभागाने मोठी धडक कारवाई करत बिना रॉयल्टी वाळू वाहतूक करणारा मिनी हायवा जप्त केला आहे. या कारवाईमुळे वाळू माफियांचे अक्षरश धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मिनी हायवा वाहन अवैधरित्या वाळू उत्खनन करून कोणतीही शासकीय रॉयल्टी न भरता बिनधास्तपणे वाहतूक करत असल्याची गुप्त माहिती महसूल विभागाला मिळाली होती. त्यानंतर महसूल पथकाने नियोजनबद्ध सापळा रचत संबंधित वाहन अडवून ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेले वाहन पुढील कायदेशीर कारवाईसाठी मंठा

तहसील प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आले आहे.या धडक मोहिमेत महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नायगाव, सासखेडा, दूधा, हानवतखेडा, लिमखेडा, तळणी, टाकळखोपा,उस्वद, देवठाणा या परिसरात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीवर महसूल प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रीत केले असून संशयित वाहनांवर करडी नजर ठेवण्यात येत आहे.

मंठा तालुक्यात दिवसेंदिवस वाढणाऱ्या अवैध वाळू तस्करीमुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असून पर्यावरणालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. नदीपात्रांचे होत असलेले नुकसान भूजल पातळीवर होणारा परिणाम आणि बेकायदेशीर उत्खननामुळे नागरिकांमध्येही तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर महसूल प्रशासन आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले असून अवैध वाळू माफियांना कोणतीही गय केली जाणार नाही असा स्पष्ट इशाराच प्रशासनाने दिला आहे.

दरम्यान, महसूल विभागाच्या या आक्रमक कारवाईमुळे अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून आगामी काळात आणखी मोठ्या कारवाया होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आष्टीत दोन कोटींच्या अत्याधुनिक सार्वजनिक अभ्यासिकेचे आ.धस यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक व दर्जेदार अभ्यास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आष्टी नगरपंचायतच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या दोन कोटी रुपये निधीच्या अत्याधुनिक सार्वजनिक अभ्यासिकेचे भूमिपूजन गुरुवारी आ. सुरेश धस यांच्या हस्ते पार पडले.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षा, प्रशासकीय सेवा तसेच विविध शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत असले तरी त्यांना अभ्यासासाठी आवश्यक सुविधा व पोषक वातावरण उपलब्ध होत नाही. ही बाब लक्षात घेऊन आधुनिक सुविधा, शांत वातावरण आणि विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार सुसज्ज अशी सार्वजनिक अभ्यासिका उभारण्यात येणार असल्याचे यावेळी धस यांनी सांगितले. तसेच पुढे बोलताना या अभ्यासिकेमध्ये विद्यार्थ्यांना स्वतंत्र अभ्यास व्यवस्था, आधुनिक सुविधा तसेच स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक वातावरण उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार असून त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणे दर्जेदार अभ्यास सुविधा आपल्या तालुक्यातच मिळणार असल्याचेही धस शेवटी म्हणाले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त करत या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळण्यासोबतच ग्रामीण भागातील युवकांना स्पर्धा परीक्षांसाठी प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, नगरसेवक सुरेश वारुंगुळे, भारत मुरकुटे, शरीफ शेख, ज्ञानदेव राऊत, इंजिनीयर शिरसाट आदी उपस्थित होते.

कु.प्रणिता गायकवाड हिचा आ.सुरेश धस यांच्या हस्ते गौरव

थायलंडमधील बँकॉक येथे प्रथम क्रमांक पटकावत देशाचा मान उंचावला

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील दादेगाव येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे आदर्श शिक्षक नानासाहेब बुधाजी गायकवाड यांची कन्या कु. प्रणिता नानासाहेब गायकवाड हिने आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत थायलंडमधील बँकॉक येथे प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या दैदिप्यमान यशाबद्दल आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे लोकनेते तथा मराठवाडा भूषण आ. सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते तिचा विशेष सत्कार करण्यात आला.

आ. धस यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या या सत्कार समारंभात माजी जिल्हा परिषद सदस्य रामहरी महानोर, प्रणिताचे वडील नानासाहेब गायकवाड, आई सौ. विद्या गायकवाड, हर्षदा गायकवाड, अंकिता गायकवाड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी आ. सुरेश धस यांनी कु. प्रणिताचे अभिनंदन करत तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश संपूर्ण मतदारसंघासाठी अभिमानास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचालित महावीर इंग्लिश स्कूल (सीबीएसई) या शाळेत इयत्ता

सातवीमध्ये शिक्षण घेणारी कु. प्रणिता गायकवाड ही अल्पवयातच नेमबाजी या क्रीडा प्रकारात उल्लेखनीय प्रगती करत आहे. पिस्टल आणि रायफल शूटिंग या दोन्ही प्रकारांमध्ये ती सातत्याने सराव करत असून तिच्या मेहनतीच्या जोरावर तिने तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केले आहे.तिच्या जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर तिला भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. थायलंडमधील बँकॉक येथे आयोजित आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत सहभागी होत तिने अत्यंत आत्मविश्वासपूर्ण आणि अचूक नेम साधत प्रथम क्रमांक मिळवला. तिच्या या यशामुळे भारताचा तिरंगा आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमानाने फडकला असून आष्टी तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

ग्रामीण भागातून पुढे आलेल्या विद्यार्थिनीने एवढ्या लहान वयात जागतिक स्तरावर यश मिळवणे ही अत्यंत प्रेरणादायी बाब मानली जात आहे. कु. प्रणिताच्या या यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्राविषयी नवचैतन्य निर्माण झाले असून अनेक विद्यार्थिनींसाठी ती प्रेरणास्थान ठरत आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कु. प्रणिता गायकवाड हिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत तिच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. तिच्या या यशामागे आई-वडिलांचे सहकार्य, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण मेहनत असल्याचेही मान्यवरांनी नमूद केले.

संघर्ष,साहित्य आणि समाजसेवेचा सुवास दरवळवणारे व्यक्तिमत्त्व : प्रा.डॉ.आशा फड

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) नम्रता, संस्कार, जिद्द आणि समाजसेवेची अखंड तळमळ या गुणांचा सुंदर संगम म्हणजे प्रा. डॉ. आशा फड. ग्रामीण भागातील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत त्यांनी साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या संघर्षमय, प्रेरणादायी आणि समाजाभिमुख कार्याचा सौ. बबिताताई बोडखे यांनी घेतलेला हा विशेष आढावा.

अत्यंत सामान्य कुटुंबातून आलेल्या डॉ. आशा फड यांचा जीवनप्रवास सहज नव्हता. मात्र शांत, संयमी आणि सुस्वभावी वृत्तीच्या बळावर त्यांनी प्रत्येक अडचणीवर मात करत यशाची शिखरे गाठली. शालेय जीवनापासूनच त्यांच्यातील साहित्यिक आणि कलात्मक गुणांना बहर येऊ लागला होता. भाषण, लेखन, गायन, नाटक आणि एकांकिका यामध्ये त्यांचा नेहमीच उत्स्फूर्त सहभाग असायचा.

कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी दहावीपासून ते पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण अत्यंत

यशस्वीरित्या पूर्ण केले. एम.ए., बी.एड., एम.फिल., सेट आणि पीएच.डी. यांसारख्या उच्च पदव्या मिळवत त्यांनी ग्रामीण भागातील मुलींसमोर एक आदर्श निर्माण केला. वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षापासून त्यांनी कविता आणि विविध विषयांवर लेखन करण्यास सुरुवात केली. विशेषतः महिलांच्या समस्या, सामाजिक प्रश्न आणि वैचारिक विषयांवर त्यांनी प्रभावी लेखन केले आहे.

त्यांचे साहित्य केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नसून त्यात सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि वैचारिक प्रबोधनाचा ठसा दिसून येतो. लोककलेच्या माध्यमातून समाजजागृती करण्याचे महत्त्व ओळखून त्यांनी पथनाट्य, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध उपक्रमांद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे.

साहित्य क्षेत्रासोबतच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी आरोग्य शिबिरे, रक्तदान, प्रौढ साक्षरता, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती आणि वृक्षारोपण यांसारख्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. गरीब आणि गरजू विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करून त्यांना आत्मविश्वास देण्याचे कार्यही त्यांनी सातत्याने केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा जपत त्यांनी विविध व्याख्यानमाला आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेत समाजात समता, बंधुता आणि सर्वधर्मसमभावाची भावना रुजवण्याचे कार्य केले आहे. 'महाराष्ट्र राज्य नेट, सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समिती'च्या बीड जिल्हा समन्वयक म्हणूनही त्यांचे कार्य उल्लेखनीय राहिले आहे.

त्यांच्या साहित्य, शिक्षण आणि समाजसेवेतील योगदानाची दखल विविध स्तरांवर घेण्यात आली आहे. बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट कादंबरी लेखनासाठी राजस्थान साहित्य सेवा मंडळाचा प्रतिष्ठेचा पुरस्कार, तसेच नॉलेज प्लांट आणि मातृभूमी प्रतिष्ठानसह अनेक संस्थांचे पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हास्तरीय अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

स्त्री समस्यांवर निस्वार्थपणे लेखन करत मातृप्रेम, देशप्रेम, ऐक्य आणि बंधुतेचा संदेश समाजाला देणाऱ्या प्रा. डॉ. आशा फड यांचे कार्य खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आणि समाजासाठी दिशादर्शक आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त साहित्य क्षेत्रातून तसेच सौ. बबिताताई बोडखे आणि तमाम वाचकांच्या वतीने त्यांना उदंड आयुष्य आणि पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड ते पंढरपूर पालखी मार्गाच्या विकासाला गती

अद्वैतचंद्र निवासस्थान,आष्टी येथे महत्वपूर्ण बैठक संपन्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड ते पंढरपूर या वारकरी भाविकांच्या श्रद्धास्थान असलेल्या पालखी मार्गाच्या विकासासाठी आज आष्टी येथील अद्वैतचंद्र निवासस्थान येथे महत्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या मार्गाच्या विकासाबाबत सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागाला सर्वेक्षण व आवश्यक कार्यवाहीच्या सूचना दिल्यानंतर या बैठकीस विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह.भ.प. विठ्ठल महाराज यांनी सुचविलेल्या या पालखी मार्गामध्ये बीड, अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावांचा समावेश करण्यात आला आहे. वारकरी संप्रदायासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा हा मार्ग भविष्यात भक्तांसाठी सोयीचा, सुरक्षित आणि विकासाला चालना देणारा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. या पालखी मार्गासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे पत्रव्यवहार करून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण विकासाची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार शासन स्तरावर तात्काळ दखल घेत संबंधित विभागाला सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

प्रस्तावित पालखी मार्गामध्ये पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, निवडुंगा, वाहली, सावरगाव, मुगगाव, इंचरणा, केकाण वस्ती, वनवेवाडी, आष्टी तालुक्यातील मातावळी, मातकुळी, जामखेड तालुक्यातील जामवाडी, जमदरवाडी, सारोळा, खुर्दैठण, घोडेगाव, आपटी, उंडा पिंपळगाव, सटवाई जवळके, शिंदे वस्ती, परंडा तालुक्यातील चिंचपूर, मशिदीचे, पाटलाचे पांढरवाडी, शेळगाव, तांदळवाडी, देऊळगाव, डोणजे, कसाबाची बंगालवाडी, मिरगव्हाण तसेच करमाळा तालुक्यातील हिवरे नागोबाचे, लावंडे वस्ती, सालसे, आळसुंदा, वरकुटे, रोपणे, भोगेवाडी, जवळस, अंबड शिराळाचे, विठ्ठल टोणपे वस्ती, अरण, जाधववाडी, बार्डी, मेंढापूर, पखाल, पद्मावती गणपती मार्गे पंढरपूर असा विस्तृत समावेश करण्यात आला आहे.

बैठकीदरम्यान पालखी मार्गाचा नकाशा, रस्त्याची रुंदी, मार्गाची लांबी, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या रस्त्यांचे सर्वेक्षण तसेच अंतिम मार्ग निश्चिती यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. वारकरी भाविकांना सुरक्षित आणि सुसज्ज प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध तांत्रिक बाबींवरही विचारमंथन झाले. हा पालखी मार्ग केवळ धार्मिक दृष्टीनेच नव्हे तर ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक विकासाला चालना देणारा ठरणार आहे. मार्गालगतच्या गावांमध्ये रस्ते, सुविधा, व्यापारी उलाढाल तसेच पर्यटनाला चालना मिळण्यास मदत होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

या महत्वपूर्ण बैठकीस श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह.भ.प. विठ्ठल महाराज, सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ धाराशिवचे अधीक्षक अभियंता बडे साहेब तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आष्टीचे कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ उपस्थित होते. उपस्थितांनी पालखी मार्गाच्या कामासाठी समन्वयाने पुढाकार घेण्याचा निर्धार व्यक्त केला.

छत्रपती संभाजीनगर डिव्हिजनमध्ये दानापूर पोस्ट ऑफिसचा डंका

टपाल विमा स्पर्धेत राहुल तेलंगरे आणि अलीम शेख यांची ऐतिहासिक कामगिरी विभागात प्रथम क्रमांक

भोकरदन इसरार खान पठाण

भारतीय टपाल विभागाच्या छत्रपती संभाजीनगर डिव्हिजनमध्ये दानापूर पोस्ट ऑफिसने आपल्या कर्तृत्वाचा झेंडा फडकवला आहे. नुकत्याच पार पडलेल्या पीएलआय आणि आरपीएलआय विशेष मोहिमेत दानापूर येथील राहुल तेलंगरे आणि अलीम शेख यांनी संपूर्ण विभागात प्रथम क्रमांक पटकावून दानापूरचे नाव उज्ज्वल केले आहे.

यशाचा त्रिवेणी संगम पॉलिसी, प्रीमियम आणि नवी खाती

राहुल आणि अलीम या जोडीने केवळ विमा क्षेत्रातच नव्हे तर टपाल विभागाच्या सर्वच सेवांमध्ये विक्रमी कामगिरी केली आहे. त्यांच्या कामाचा लेखाजोखा खालीलप्रमाणे आहे: १००+ नवीन विमा पॉलिसी अत्यंत अल्प कालावधीत १०० पेक्षा जास्त नागरिकांना विम्याचे सुरक्षा कवच दिले.साडेआठ लाखांचा प्रीमियम आरपीएलआय अंतर्गत ८.५० लाख रुपयांहून अधिकचा प्रीमियम जमा केला.३५०+ नवीन बँक खाती ३५० हून अधिक नागरिकांची नवीन खाती उघडून त्यांना मुख्य प्रवाहातील बँकिंग सेवेशी जोडले.

छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित एका विशेष गौरव सोहळ्यात मुख्य

पोस्टमास्टर जनरल आणि वरिष्ठ टपाल अधीक्षक यांच्या हस्ते या जोडीचा सन्मान करण्यात आला. शून्य तक्रार आणि १०० टक्के पारदर्शकता या जोरावर त्यांनी मिळवलेले हे यश इतर कर्मचाऱ्यांसाठी एक आदर्श वस्तुपाठ असल्याचे गौरवोद्गार यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काढले.हा सन्मान दानापूरच्या जनतेचाआमच्या कामावर विश्वास दाखवणाऱ्या दानापूरमधील जनतेमुळेच आज आम्ही संपूर्ण डिव्हिजनमध्ये प्रथम येऊ शकलो. हा सन्मान आम्हाला भविष्यात अधिक जोमाने सेवा देण्याची प्रेरणा देणारा आहे.

राहुल तेलंगरे विजेते कर्मचारी मेहनत आणि जनसंपर्काचे फळ

ग्रामीण भागात विम्याबद्दल असलेल्या शंका दूर करण्यासाठी या दोघांनी घरोघरी जाऊन जनजागृती केली. सरकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी घेतलेल्या परिश्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या यशामुळे दानापूर परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

जाफराबाद ।प्रतिनिधी

जाफराबाद दि.१४ शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. यावेळी परिसर भगवेमय झाला असून जय जिजाऊ, जय शिवराय तसेच धर्मवीर संभाजी महाराजांचा विजय असो अशा घोषणांनी संपूर्ण वातावरण दुमदुमून गेले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित शिवप्रेमींनी धर्मवीर संभाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि स्वराज्य रक्षणासाठी दिलेल्या बलिदानाचे स्मरण करत अभिवादन केले.

यावेळी नगराध्यक्ष दिपक पाटील वाकडे, पंचायत समितीचे माजी सभापती दगडुबा गोरे, प्रभाकर गाढे, संदीप वाकडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष मुकेश भारद्वाज, मुख्याध्यापक उमेश दुनगहू, पत्रकार विशाल वाकडे, प्रा. सचिन वाकडे, संजय जोहिरे, गणेश गायकवाड, सिद्धेश्वर वाकडे, योगेश वाकडे, डॉ. उमेश चव्हाण, मंगेश गायके, विलास चव्हाण, गजानन दीक्षित, मोहन वाकडे, किशोर वाकडे, शिवम लोखंडे, प्रकाश खुणे, डॉ. भांबळे यांच्यासह अनेक शिवप्रेमी व शंभूप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. स्वराज्याच्या रक्षणासाठी त्यांनी दिलेले योगदान आणि हिंदवी स्वराज्याप्रती असलेली त्यांची निष्ठा याचे स्मरण करून उपस्थितांनी त्यांना अभिवादन केले.कार्यक्रम शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

डॉ.सतीश सायंबर यांना पद्मपाणि राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

शिक्षण,गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकीचा गौरव

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरणारी आनंदाची बातमी म्हणजे जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, सुलेमान देवळा येथील गणित-विज्ञान विषयाचे अभ्यासू व विद्यार्थिप्रिय शिक्षक डॉ. सतीश किसन सायंबर यांना पद्मपाणि राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी घेतलेले परिश्रम, सामाजिक बांधिलकीची जपणूक तसेच पर्यावरणपूरक उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांना जाहीर करण्यात आला आहे.

डॉ. सतीश सायंबर यांनी दिनांक २६ नोव्हेंबर १९९६ रोजी आष्टी तालुक्यातील शिराळ येथे शिक्षक म्हणून आपल्या सेवेला प्रारंभ केला. शिक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांनी केवळ अध्यापनापुरते स्वतःला मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने विविध उपक्रम सातत्याने राबविले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा तसेच शिक्षणाबरोबरच सामाजिक जाणीवा विकसित व्हाव्यात यासाठी त्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, पर्यावरण जनजागृती अभियान आणि शैक्षणिक स्पर्धांचे प्रभावी आयोजन केले.

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी त्यांनी नेहमीच नवनवीन अध्यापन पद्धतींचा अवलंब केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले असून अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शिक्षकांनी सातत्याने संशोधनात्मक दृष्टिकोन ठेवावा, हा त्यांचा विचार त्यांच्या कार्यातून सातत्याने दिसून येतो.

त्या काळात शिक्षण क्षेत्रात गाजलेल्या गुणवत्तेच्या मराठवाडा रमणी पॅटर्न उपक्रमामध्ये डॉ. सायंबर यांनी आपल्या शाळेला तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून देत शाळेची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता उंचावली गेली असून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले. त्यांच्या मेहनतीमुळे शाळेच्या निकालात सातत्याने वाढ झाली आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे कार्य त्यांनी केले.

शिक्षणासोबतच सामाजिक क्षेत्रातही डॉ. सायंबर यांनी मोलाचे योगदान दिले आहे. पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, ग्रामजनजागृती यांसारख्या उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण व्हावी यासाठी त्यांनी विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले. शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून समाज घडवणारा घटक आहे, याची प्रचिती त्यांच्या कार्यातून वेळोवेळी दिसून आली आहे.

पद्मपाणि राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ वितरण सोहळा दिनांक १७ मे २०२६ रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या सोहळ्यात डॉ. सतीश किसन सायंबर यांचा सन्मान करण्यात येणार असून त्यांच्या कार्याचा गौरव राज्यस्तरावर होणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सुलेमान देवळा येथील मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामस्थ, विद्यार्थी, पालक तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरत आहे.

अंबड महसूल विभागाचा वाळू माफियांवर पुन्हा सर्जिकल स्ट्राईक

साष्टपिंपळगाव शिवारात अवैध वाळूने भरलेला हायवा जप्त चालकावर गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल

अंबड ।प्रतिनिधी

गोदावरी नदीपात्राची अक्षरश लूट करून शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडवणाऱ्या वाळू माफियांविरोधात अंबड महसूल विभागाने पुन्हा एकदा धडक कारवाई करत माफियांचे धाबे दणाणून सोडले आहेत. साष्टपिंपळगाव शिवारात विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा महसूल पथकाने रंगेहाथ पकडत जप्त केला असून चालकाविरोधात गोंदी पोलीस ठाण्यात विविध गंभीर कलमान्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वात महसूल विभागाने ही कारवाई करत वाळू माफियांना थेट इशाराच दिला आहे.

गस्तीदरम्यान महसूल पथकाच्या जाळ्यात हायवा

अंबड तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल विभागाने विशेष स्थिर पथक तैनात केले आहे. साष्टपिंपळगावचे तलाठी सुनील तेजराव उंबरहंडे, मंडळ अधिकारी कृष्णा येडके, तलाठी पवन तुपकर आणि तलाठी विशाल अनारुपे हे पथक दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी साष्टपिंपळगाव-आपेगाव रस्त्यावर गस्त घालत होते.

यावेळी चक ०३ ऊत ९८११ क्रमांकाचा हायवा संशयास्पद अवस्थेत येताना दिसला. पथकाने वाहन थांबवून तपासणी केली असता ट्रकमध्ये गोदावरी नदीपात्रातील वाळू भरलेली असल्याचे उघड झाले. चालकाकडे रॉयल्टी पावती किंवा कोणताही वैध परवाना नसल्याने महसूल अधिकाऱ्यांनी तात्काळ वाहन जप्त करत तहसील कार्यालय अंबड येथे जमा केले.

चालकाविरोधात गंभीर कलमान्वये गुन्हा

या प्रकरणी चालक राजू तुळशीराम राठोड रा. छत्रपती संभाजीनगर याच्याविरोधात तलाठी सुनील उंबरहंडे यांच्या फिर्यादीवरून गोंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता इछड २०२३ कलम ३०३(२)-चोरी कलम २२३ लोकसेवकाच्या आदेशाची अवज्ञा महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ कलम ४८(७) व ४८(८) खाण आणि खनिज नियमन व विकास अधिनियम १९५७ कलम ४ व २१ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ कलम ३ वाळू माफियांना कुठलीही दया नाही तहसीलदार विजय चव्हाण अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीमुळे नदीपात्रांचे मोठे नुकसान होत असून शासनाचा महसूलही बुडत आहे. त्यामुळे अशा प्रकारांना अजिबात पाठीशी घातले जाणार नाही असा कडक इशारा तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिला. अंबड तालुक्यात अवैध वाळू अथवा गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. अशी वाहने जप्त करून संबंधितांवर कठोर फौजदारी कारवाई करण्यात येईल. नागरिकांनीही अशा प्रकारांची माहिती प्रशासनाला द्यावी. विजय चव्हाण तहसीलदार अंबड महसूल विभागाचा धडाका कायम अंबड महसूल विभागाने मागील काही दिवसांत अवैध वाळू वाहतुकीविरोधात सातत्याने मोहीम उघडली असून महसूल प्रशासनाच्या वाढत्या कारवाईमुळे वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रशासनाच्या या आक्रमक भूमिकेमुळे अवैध वाळू उपसा करणाऱ्या टोळ्यांचे धाबे दणाणले असून आगामी काळात आणखी मोठ्या कारवाया होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सहादू मोरे यांचे निधन

आष्टी ।प्रतिनिधी

सहादू चंद्रभान मोरे यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ७८ व्या वर्षी दिनांक १२ रोजी निधन झाले त्याच्यावर दिनांक १३ रोजी सकाळी त्यांच्या शेतात अंत्यविधी करण्यात आला ते आष्टीचे सरपंच मधुकर मोरे यांचे वडील व कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक योगेश मोरे यांचे आजोबा होते कुटुंबात त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले, तीन मुली,सुना नातवंडे असा परिवार आहे

जालना बांधकाम कामगार महाघोटाळा कामगार मंत्री अशिषजी जैस्वाल आक्रमक अधिकारी अमोल जाधवांच्या चौकशीचे आदेश

जालना शेख फारुक

जालना जिल्ह्यातील बांधकाम कामगार अर्थसहाय्य योजनेत झालेल्या कथित महाघोटाळ्याचे पडसाद आता थेट मंत्रालयात उमटले आहेत. या प्रकरणातील संशयित आरोपी कामगार अधिकारी श्री. अमोल जाधव यांच्या चौकशीसाठी महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री ना. आशिषजी जैस्वाल यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून त्यांच्या दालनात वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक पार पडली. या बैठकीत सात दिवसांच्या आत सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे कठोर निर्देश मंत्र्यांनी दिले आहेत.कामगारांच्या घामाच्या पैशावर डल्ला मारणाऱ्यांची खैर नाही

जालना जिल्ह्यात बांधकाम कामगारांच्या हक्काच्या निधीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याच्या आणि लाभार्थ्यांवर अन्याय झाल्याच्या तक्रारी शासन स्तरावर धडकल्या होत्या. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून शिवसेना शिव उद्योग सहकार सेनेचे प्रदेशाध्यक्ष रामेश्वर वाडेकर यांनी या घोटाळ्याचा पर्दाफाश करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. या बैठकीस वाडेकर स्वतः उपस्थित होते.दोषींवर कठोर कारवाई निधी वितरणातील संशयास्पद बाबी आणि अधिकाऱ्यांच्या संशयास्पद भूमिकेवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.अहवालासाठी सात दिवसांची मुदत मंत्री महोदयांनी कामगार विभागाच्या उपसचिवांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांना सात दिवसांच्या आत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.दोषी सुटणार नाहीत कामगारांच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या कोणत्याही भ्रष्ट प्रवृत्तीला पाठीशी घातले जाणार नाही दोषींवर कठोर कारवाई होईल असे आश्वासन नामदार जैस्वाल यांनी दिले.

या बैठकीबाबत माहिती देताना प्रदेशाध्यक्ष रामेश्वर वाडेकर म्हणाले की शिवसेना शिव उद्योग सहकार सेना ही नेहमीच सर्वसामान्य कामगारांच्या न्याय हक्कासाठी कटिबद्ध आहे. जालना जिल्ह्यातील हजारो कामगारांची फसवणूक करणाऱ्यांना आम्ही सोडणार नाही. जोपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही आणि कामगारांना त्यांचा हक्क मिळत नाही, तोपर्यंत हा लढा अधिक तीव्र केला जाईल.

या महत्त्वपूर्ण बैठकीस कामगार मंत्र्यांचे पी.एस.,ओ.एस.डी., कामगार विभागाचे उपसचिव आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या निर्णयामुळे आता जालना जिल्ह्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले असून कामगारांमध्ये न्यायाची आशा पल्लवित झाली आहे.

अबड तहसील कार्यालयाचा अखेरचा इशारा विलंबित

जन्म-मृत्यू नोंदींच्या संचिका आता आर या पार

एका आठवड्यात त्रुटी पूर्ण करा अन्यथा प्रकरणे थेट रद्द- तहसीलदार विजय चव्हाण यांचा कडक अल्टीमेटम

अंबड ।प्रतिनिधी

तहसील कार्यालयाने विलंबित जन्म आणि मृत्यू नोंदींसंदर्भातील प्रलंबित संचिकांवर आता थेट धडक कारवाई चा इशारा दिला आहे. जुलै २०२५ पर्यंतच्या प्रकरणांमध्ये आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या अर्जदारांना अंतिम मुदत देण्यात आली असून येत्या एका आठवड्यात त्रुटी दूर न केल्यास संबंधित संचिका विना निर्णय निकाली काढून कायमस्वरूपी रद्द करण्यात येणार असल्याचा स्पष्ट आणि कठोर इशारा तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी विजय चव्हाण यांनी दिला आहे.

महाराष्ट्र शासनाने बनावट आणि बोगस जन्म-मृत्यू नोंदींना आळा घालण्यासाठी अत्यंत कठोर डजझ लागू केली असून एक वर्षापेक्षा अधिक कालावधीने होणाऱ्या नोंदींसाठी पुराव्यांची साखळी बंधनकारक केली आहे. शासनाच्या १२ मार्च २०२५ च्या आदेशानुसार वैद्यकीय, शैक्षणिक, रहिवासी आणि कौटुंबिक पुरावे अनिवार्य करण्यात आले आहेत.

मात्र अंबड तहसील कार्यालयात जुलै २०२५ पूर्वी दाखल झालेल्या ५० हून अधिक संचिका गेल्या वर्षभरापासून केवळ अर्जदारांच्या हलगर्जीपणामुळे रखडल्याचे समोर आले आहे. आता या सर्व संचिकांचा स्पेशल ड्राईव्ह राबवून एका आठवड्यात निकाल लावण्याची मोहीम प्रशासनाने हाती

घेतली आहे.

प्रकरणांमध्ये आढळलेल्या गंभीर त्रुटी

तहसील प्रशासनाच्या तपासणीत अनेक संचिकांमध्ये धक्कादायक त्रुटी समोर आल्या आहेत. त्यामध्ये स्थानिक वृत्तपत्रात १५ दिवसांचे जाहीर प्रगटनच प्रकाशित नसणे,ग्रामसेवक किंवा मुख्याधिकाऱ्यांचा चौकशी अहवाल जोडलेला नसणे,पोलीस पाटील व बीट अंमलदारांचे प्रत्यक्ष पडताळणी अहवाल अनुपस्थित असणे,जन्म किंवा मृत्यू संदर्भातील रुग्णालयीन नोंदी अथवा वैद्यकीय पुरावे उपलब्ध नसणे,शाळा सोडल्याचा दाखला रहिवासी पुरावे आणि कौटुंबिक दस्तऐवज अपूर्ण असणे या गंभीर त्रुटींमुळे अनेक संचिका प्रलंबित राहिल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आता कुठलीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही तहसील कार्यालयाने संबंधित अर्जदारांना अंतिम अल्टीमेटम देत स्पष्ट केले आहे की एका आठवड्याच्या आत सर्व वैध व कायदेशीर पुरावे सादर करणे बंधनकारक राहणार आहे. अन्यथा शासनाच्या निर्देशानुसार कोणतीही पुढील सुनावणी न करता संचिका थेट रद्द करण्यात येतील.

यासोबतच ऑगस्ट २०२५ मधील प्रलंबित प्रकरणांची सुनावणी मे २०२६ च्या अखेरच्या आठवड्यात घेण्यात येणार असून त्या अर्जदारांनीदेखील वेळेत त्रुटी दूर न केल्यास त्यांची प्रकरणे कायमस्वरूपी बंद करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

फक्त आधार कार्ड चालणार नाही

शासनाच्या नव्या नियमांनुसार केवळ आधार कार्ड दाखवून जन्म किंवा मृत्यू नोंद मंजूर केली जाणार नाही. अधिकृत आणि पडताळणीयोग्य पुरावे अनिवार्य असतील, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दलालांपासून सावध राहा लाच मागितल्यास थेट तक्रार करा

तहसीलदार विजय चव्हाण यांनी नागरिकांना कठोर शब्दांत इशारा देत सांगितले की कुणीही अवैध व्यक्ती दलाल किंवा मध्यस्थ यांच्याशी संपर्क साधू नये. कोणत्याही प्रकारची लाच किंवा पैशांची मागणी होत असल्यास पुराव्यानिशी थेट तहसील कार्यालयाकडे तक्रार करावी.

अफवांवर विश्वास ठेवू नका तहसीलदार विजय चव्हाण शासन नियमांनुसारच प्रत्येक प्रकरणाचा निर्णय घेतला जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले.

ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत किनवट पोलिसांची अंबाडी येथे अवैध दारू विक्रेत्यावर धाड

किनवट ।प्रतिनिधी

जिल्हाभर सुरू असलेल्या ऑपरेशन क्रॅक डाऊन मोहिमेअंतर्गत किनवट पोलिसांनी अंबाडी येथे अवैध दारू विक्री करणाऱ्यावर कारवाई करत मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, किनवट पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक (झडख) सागर झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने बुधवार, दि. १३ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ८.२० वाजण्याच्या सुमारास मौजे अंबाडी ता. किनवट येथे छापा टाकला. यावेळी आरोपी रामप्रसाद दर्शनलाल जैस्वाल (रा. अंबाडी, ता. किनवट) यांच्या राहत्या घराची झडती घेतली असता तेथे देशी व विदेशी बनावटीची अवैध दारू साठवून विक्रीसाठी ठेवलेली आढळून आली. पोलिसांनी घटनास्थळावरून अंदाजे १५ हजार १४० रुपयांचा देशी-विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १००/२०२६ नोंद

करण्यात आला असून महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार डगवाल यांनी फिर्याद दिली असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली झडख सागर झाडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार डुकरे, डगवाल, पुरी, पोलीस शिपाई अन्नमवार, महिला पोलीस शिपाई जानगेवाड तसेच पोलीस शिपाई अनंतवार यांच्या पथकाने केली. किनवट पोलिसांच्या या कारवाईचे परिसरातून स्वागत करण्यात येत असून अवैध धंद्यांविरोधातील मोहिम आणखी तीव्र करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

गुंडेगाव येथील स्वगणनना पुर्ण केल्या बदल प्रगंणक गोदावरी पवार व तलाठी वानोळे यांच्या महास्वराजय शिबीरात सत्कार

नवीन नांदेड -धनेगाव येथील महासवराज शिबीरात गुडेगाव शंभर टक्के स्वगणंणा पुर्ण केल्या बदल प्रगंणक गोदावरी पवार व तलाठी वानोळे यांच्या उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ व नांदेड तहसीलदार संजय वारकड यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

नांदेड तहसीलदार कार्यालय अंतर्गत असलेल्या नांदेड दक्षिण तालुक्यातील गुंडेगाव व वाडीकरडेल या गावांमध्ये शंभर टक्के स्वगणणा प्रकिया पुर्ण करण्यात आली असून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासनाचे नांदेड तहसीलदार संजय वारकड यांनी ही मोहीम राबविली असून गावांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

स्वगणनना प्रक्रियेदरम्यान गावातील नागरिकांची माहिती,कुटूंब नोंदी,घराची माहिती, संकलित करण्यात आली, प्रशासनाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी गावात जाऊन माहिती संकलित केली.स्वगणनना पुर्ण झाल्यानंतर प्रत्येक कुंटूबाला स्वतंत्र स्वगणनना आयडी प्रदान करण्यात येत आहे या आयडीमुळे आगामी जणगणनना प्रक्रिया अधिक सुलभ व अचूक होण्यास मदत होणार आहे.शासनाचा विविध योजना प्रभावी नियोजन आणि लाभार्थ्यांची अचूक नोंदणी करण्यासाठी ही प्रक्रिया महत्वपूर्ण ठरणार आहे.ही मोहीम पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने राबविण्यासाठी तलाठी तथा प्रयवेक्षक वानोळे व प्रगणक गोदावरी पवार तसेच संबंधित विभागातील अधिकारी समन्वयाने काम करत स्वगणनना मोहीम यशस्वी केली आहे.

गुंडेगाव येथील स्वगणनना पुर्ण केल्या बदल १४ मे रोजी नांदेड तहसील कार्यालय यांच्या वतीने वसरणी मंडळ अंतर्गत महास्वराज शिबिर प्रसंगी उपविभागीय अधिकारी डॉ सचिन खल्लाळ व नांदेड तहसीलदार संजय वारकड यांनी प्रगंणक गोदावरी पवार व तलाठी वानोळे यांच्या सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

शिवणकामगार संतोष राऊलवार यांच्या निधनानंतर आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी घेतली सांत्वनपर भेट

तामसा ।प्रतिनिधी

वडगांव (बु.) येथील रहिवासी आणि प्रसिद्ध शिवणकामगार संतोष राऊलवार यांचे ४ एप्रिल रोजी मोटारसायकलच्या भीषण अपघातात अकाली निधन झाले आहे. या दुर्दैवी घटनेमुळे राऊलवार कुटुंबावर कोसळलेल्या दुःखाच्या डोंगरात सहभागी होत, हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी नुकतीच त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबाचे सांत्वन केले.

संतोष राऊलवार हे आपल्या मनमिळावू स्वभावासाठी आणि उत्कृष्ट शिवणकामासाठी तामसा परिसरात परिचित होते. ४ एप्रिल रोजी झालेल्या मोटारसायकल अपघातात त्यांना आपले प्राण गमवावे लागले. त्यांच्या निधनाने राऊलवार कुटुंबाचा मुख्य आधार हरपल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी संतोष राऊलवार यांच्या घरी जाऊन त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी उपस्थित कुटुंबीयांशी संवाद साधला आणि त्यांना धीर दिला. संतोष राऊलवार यांच्या जाण्याने एका कष्टकरी तरुणाला आपण मुकलो आहोत. या कठीण काळात आम्ही राऊलवार कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. अशा भावना आमदार कोहळीकर यावेळी व्यक्त केल्या. यावेळी माजी उपसभापती बाबूसराव कदम रुईकर, शिवसेना समन्वयक केशवराव हरण, तामसा ग्रामपंचायत सदस्य सुभाष धरमुरे, तामसा विभागप्रमुख संतोष ठमके, शिवसेना (उबाठा)नेते अशोक फाळके, कार्यकर्ते ज्ञानेश्वर विभुते, छगन हरण, पत्रकार संजय राऊलवार, अर्जुन जोशी, शिवम राऊलवार उपस्थित होते. राऊलवार कुटुंबाला आवश्यक ती सर्व मदत करण्याचे आश्वासनही आमदार कोहळीकर यांनी दिले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात काळ्याफिती आंदोलनास सुरुवात; शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शासनाविरोधात इशारा

नांदेड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी कृती समितीच्या राज्यव्यापी आंदोलनाच्या पहिल्या टप्प्याला आजपासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे सुरुवात करण्यात आली. विद्यापीठातील विविध कर्मचारी संघटनांनी काळ्याफिती लावून कामकाज करत शासनाच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढावेत, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

महाराष्ट्रातील राज्य सार्वजनिक विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अनेक मूलभूत व दीर्घकालीन प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याने राज्यभरातील कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्य विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी कृती समितीच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करूनही शासन स्तरावर अपेक्षित निर्णय होत नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे.

प्रमुख मागण्यांमध्ये सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षांनंतर मिळणारी आश्वासित प्रगती योजना लागू करणे, उर्वरित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, २००५ पूर्वी जाहिरात प्रक्रिया पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे रजारोखीकरण अंतिम वेतनाच्या आधारे अदा करणे, रिक्त शिक्षकेतर पदभरतीस मंजुरी देणे, तसेच प्रयोगशाळा सहाय्यक व परिचरांना पूर्ववत लाभ सुरू करणे या मागण्यांचा समावेश आहे.

तसेच नव्याने सुरू झालेल्या महाविद्यालयांतील मुख्य लिपिक व वरिष्ठ लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे निकाली काढणे, न्यायप्रविष्ट नसलेल्या महाविद्यालयांतील प्रयोगशाळा सहाय्यकांची सातव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करणे, पदोन्नतीचे प्रमाण ५०:५० ऐवजी ८०:२० करण्यास मान्यता देणे तसेच बंद करण्यात आलेली डीसीपीएस वर्गणी कपात पुन्हा सुरू करणे या मागण्याही करण्यात आल्या आहेत.

आंदोलनाच्या पुढील टप्प्यांमध्ये १८ ते २० मे दरम्यान दुपारच्या सुट्टीत धरणे, निषेध सभा व घोषणाबाजी, २५ मे रोजी राज्यव्यापी लेखणी बंद आंदोलन, २९ मे रोजी विभागीय सहसंचालक कार्यालयांसमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. शासनाने निर्णय न घेतल्यास १ जून रोजी लाक्षणिक कामबंद आंदोलन तर ८ जून २०२६ पासून बेमुदत संप आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा कृती समितीने दिला आहे.

या आंदोलनात विद्यापीठातील अधिकारी फोरम, विद्यापीठ कर्मचारी संघ, मागासवर्गीय कर्मचारी संघटना,विद्यापीठ कर्मचारी संघटना तसेच विद्यापीठ कर्मचारी फंड संघटना आदींनी सक्रिय सहभाग नोंदविला असून शासनाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

ग्रामीण गृहनिर्माणात नांदेड जिल्हा परिषदेचा राज्यात एक नंबर

नांदेड जिल्हा प्रतिनिधी ग्रामीण भागातील बेघर व गरजू नागरिकांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विविध स्तरावर प्रभावी प्रयत्न करण्यात येत आहेत. या अभियानात उल्लेखनीय कामगिरी करत नांदेड जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, तालुका स्तरावर माहूर तालुक्याने राज्यात सर्वोत्कृष्ट कामगिरीचा मान मिळविला आहे.

महा आवास अभियान २०२३-२४ अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली. राज्य पुरस्कृत आवास योजनेत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना तसेच मोदी आवास योजना या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत नांदेड जिल्ह्याने उत्कृष्ट कार्य करत राज्यात अव्वल स्थान मिळविले आहे. त्याचबरोबर आदिवासी बहुल माहूर तालुक्यानेही उत्कृष्ट नियोजन व प्रभावी अंमलबजावणीच्या जोरावर राज्यात सर्वोत्कृष्ट तालुक्याचा बहुमान मिळविला आहे.

या यशामागे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. त्यांनी वेळोवेळी बैठका घेऊन योजनांचा आढावा घेतला. तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांनी सातत्याने पाठपुरावा करून अभियान गतिमान केले. त्यामुळेच नांदेड जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला आहे.

माहूर तालुक्यातही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. लाभार्थ्यांना वेळेत घरे मंजूर करणे, बांधकाम पूर्णत्वास नेणे आणि शासनाच्या उद्दिष्टांची यशस्वी पूर्तता करणे यामध्ये माहूर तालुक्याने उल्लेखनीय कामगिरी केली.

पुरस्कारचे आज वितरण

या पुरस्कारांचे वितरण आज १५ मे रोजी सैनिक स्कूल, सातारा येथे

होणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले तसेच माहूरचे गट विकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

धनेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर अभियान टप्पा एक समाधान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

८७१ सातबारा व ५९१ आठ-अ उताऱ्यांचे वाटप, १२ जणांना संजय गांधी योजनेचा लाभ

नवीन नांदेड ।प्रतिनिधी

शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य समाधान शिबिर अभियान (टप्पा क्र. १) अंतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड तालुक्यातील धनेगाव येथे १४ मे रोजी उपविभागीय अधिकारी डॉ सचिन खल्लाळ व नांदेड तहसीलदार संजय वारकड यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले.यावेळी लाभार्थ्यांना विविध शासकीय योजना लाभ प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

यावेळी विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्यामुळे या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या शिबिरामध्ये ग्रामविकास,आरोग्य,कृषी, भूमिअभिलेख (मोजणी) तसेच दुय्यम निबंधक विभागासह विविध शासकीय विभागांनी सहभाग घेतला. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देत लाभार्थ्यां कडून अर्ज स्वीकारले.

तहसील कार्यालय, नांदेड यांच्या वतीने शिबिरात महसुली सेवांचे मोठ्या प्रमाणावर वितरण करण्यात

आले,यामध्ये ८७१ऑनलाईन सातबारा उतारे व ५९१ आठ-अ उतारे नागरिकांना देण्यात आले. तसेच १२ पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला. याशिवाय फेरफार संदर्भातील अर्जही स्वीकारण्यात आले.

शिबिरामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, सातबारा, ८-अ उतारे, सातबारा दुरुस्ती, फेरफार नोंदी आदी महसुली सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच आरोग्य विभाग, भूमिअभिलेख विभाग व पंचायत विभागानेही नागरिकांना विविध सेवा पुरवल्या.या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ यांनी मार्गदर्शन केले. तहसीलदार संजय वारकड यांनी प्रास्ताविकातून अभियानाची रूपरेषा स्पष्ट केली.नायब तहसीलदार सुनील माचेवाड यांनी सूत्रसंचालन केले,तर स्वप्नील दिगलवार यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. पुरवठा निरीक्षक रवींद्र राठोड यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे निराकरण केले.तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांनी उपस्थित राहून अभियानास सहकार्य केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळ अधिकारी सय्यद मोसिन अहमद तसेच तलाठी दीपक सोनटक्के, राम मुंडे आणि संजय वानोळे यांनी विशेष योगदान दिले. तसेच मंडळ अधिकारी येलमट्टी संतोष आस्कुलकर व बडवणे ,तलाठी मनोज पे गिरी,जमदाडे व श्रीरामे यांनीही सहकार्य केले